दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ५ वे अंक –३५० | शनिवार,दि.२३ ऑगस्ट २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-350 | Saturday, Dt.23 August 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# मराठा आरक्षण उपसमितीचं अध्यक्षपद राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे

## मनोज जरांगेंच्या आंदोलनापूर्वी मोठ्या घडामोडी

प्रतिनिधी । बीड

मुंबई : महाराष्ट्र सरकारनं मनोज जरांगे पाटील यांचं मुंबईतील २९ ऑगस्टचं आंदोलन सुरु होण्यापूर्वी मराठा आरक्षणासंदर्भात एक मोठा निर्णय घेतला आहे. मराठी आरक्षण उपसमितीच्या अध्यक्षपदामध्ये फेरबदल करण्यात आला आहे.मराठा समाजाच्या उपसमितीच्या अध्यक्षपदी राधाकृष्ण विखे पाटील यांची निवड करण्यात आली आहे. यापूर्वी चंद्रकांत पाटील हे या उपसमितीचे अध्यक्ष होते. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखालील उपसमिती मराठा समाजाची सामाजिक , आर्थिक शैक्षणिक स्थितीबाबत आढावा घेत राहणार आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या आधी राज्य सरकारकडून उपसमितीचं पुनर्गठन करण्यात आलं आहे.

मराठा आरक्षण उपसमिती कोणती कामं करणार?

उपसमितीमार्फत मराठा आरक्षणाविषयक प्रशासकीय आणि वैधानिक कामकाजाचा समन्वय ठेवण्यात येणार आहे. न्यायप्रविष्ठ प्रकरणांमधील शासनाच्या वतीनं बाजून मांडण्यासाठी नेमलेल्या समुपदेशींशी समन्वय ठेवण्यात येणार, सोबतच विशेष समुपदेशींना सूचना समितीकडून दिल्या जाणार आहेत. न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशाच्या अंमलबजावणीबाबतची कार्यपद्धती उपसमितीकडून ठरविले जाणार आहे.



न्या. संदीप शिंदे यांच्या समितीसोबत समन्वय ठेवणे. मराठा आंदोलन आणि त्यांचे शिष्टमंडळाशी चर्चा करणे. जातप्रमाणपत्र देण्यात येणाऱ्या अडचणींबाबत निर्णय प्रक्रिया सुरळीत करणे. मराठा समाजासाठी केलेल्या योजना तसेच सारथी आणि आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ यांच्या मार्फत मराठा समाजासाठी राबवण्यात येणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे, अशी कामं मराठा आरक्षण उपसमितीकडून करण्यात येणार आहेत.

### मनोज जरांगे यांचं २९ ऑगस्टपासून मुंबईत आंदोलन


मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भातील विविध मागण्यांसाठी मुंबईतील आझाद मैदानात आंदोलन करण्यात येणार आहे. त्यासंदर्भातील तयारी आणि बैठका विविध ठिकाणी सुरु आहेत. मनोज जरांगे यांचं मुंबईतील आंदोलन सुरु होण्यापूर्वीच राज्य सरकार सक्रीय झाल्याचं मराठा आरक्षण उपसमितीच्या पुनर्गठनातून दिसून येत आहे. मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला सरसकट ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी केलेली आहे. त्यामागणीला ओबीसींचा विरोध आहे. दरम्यान, कुणबी नोंदी आढळल्या आहेत त्यांना ओबीसीतून लाभ घेता येतो. एकनाथ शिंदे सरकारच्या काळात कुणबी नोंदी शोधण्याची मोहीम देखील सुरु करण्यात आली होती.

# सण उत्सवात स्वत: आनंद घेत असताना, इतराना त्रास होणार नाही याची दक्षता घ्या – नवनीत कॉवत

प्रतिनिधी @ बीड

गणेश उत्सव संबंधाने बीड शहर साठीची बैठक पोलिस अधीक्षक कार्यालयात उत्साहात पार पडली. या बैठकी साठी शहरातील विविध नागरिक, शांतता कमिटीचे सदस्य, गणेश मंडळांचे पदाधिकारी, पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, नगर सचिव सम्राट कदम, सर्व ठाणे अधिकारी आदी हजर होते.

बैठकीस संबोधित करताना पोलिस अधीक्षक श्री नवनीत कॉवत यांनी सर्व मंडळांना सोप्या पद्धतीने आणि अडथळे न येऊ देता परवानगी देण्यात येईल, सर्वांना योग्य सुरक्षा व्यवस्था देण्यात येईल, कोठेही काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून महिला पोलीस, होमगार्ड, चिडीमार पथक, यासह अधिकारी आणि अंमलदार असे १५०० पोलिस पेक्षा जास्त बंदोबस्त उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे पोलिस अधीक्षक यांनी सांगितले आहे.




पोलिस अधीक्षक यांनी आवाहन आणि सूचना केल्या आहेत की, सर्व गणेश मंडळांनी सीसीटीव्ही आणि स्वत:चे स्वयंसेवक सुरक्षेसाठी तैनात करावे, सण उत्सव साजरा करत असताना इतराना त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी, आवाजाची तीव्रता शासन नियम प्रमाणे ठेवावी आदी बाबी सुचवल्या आहेत.संपूर्ण गणेश उत्सव शांततेत आणि उत्साहात पार पडेल अशी खात्री सर्व गणेश मंडळांनी दिली आहे.

# अंबड बस स्थानकात घाणीचं साम्राज्य – प्रवाशांचे आरोग्य धोक्यात

प्रतिनिधी @ अंबड

अंबड बस स्थानकातील अस्वच्छता दिवसेंदिवस गंभीर स्वरूप धारण करत असून, प्रवाशांच्या आरोग्याशी थेट खेळ केला जात असल्याचं चित्र आहे. स्थानकातील प्लॅटफॉर्म, बसण्याच्या आसनांवर ठिकठिकाणी गुटखा आणि तंबाखूच्या पिचकाऱ्यांचे डाग असून, त्यामुळे प्रचंड दुर्गंधी पसरली आहे.स्थानक परिसर मोठा असून देखील येथे केवळ दोनच सफाई कर्मचारी काम करत असल्याचे निदर्शनास आले आहे.



दररोज हजारो प्रवासी या स्थानकाचा वापर करतात, मात्र स्वच्छतेकडे पूर्णतः दुर्लक्ष करण्यात येत आहे. स्थानक व्यवस्थापनाच्या ढिसाळ कारभारामुळे प्रवाशांना उभं राहण्याशिवाय दुसरा पर्याय राहत नाही.स्थानिक नागरिक आणि प्रवाशांनी डेपो मॅनेजरवर जाणूनबुजून दुर्लक्ष केल्याचा आरोप केला असून, या प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ लक्ष घालून कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.जनतेचे आरोग्य धोक्यात घालून प्रशासनाचे डोळेझाक कशी चालेल?

# महावितरणची आकडे मुक्तीची मोहीम

## बीड विभागाच्या कारवाईत एकाच दिवसात १६० वीजचोरांचा पर्दाफाश

प्रतिनिधी @ बीड

वीजहानी कमी करण्याच्या दृष्टिने अतिवीजहानी असलेल्या वीजवाहिन्यावरील वीजचोरी विरोधात गुरूवारी (दि.२१) राबविलेल्या विशेष महामोहीमेत महावितरणच्या बीड विभागातील सर्व उपविभागाच्या वीजचोरी बहुल भागात राबविलेल्या धडक कारवाईत तब्बल १६० आकडे बहाद्दरांना महावितरणने चांगलाच दणका दिला आहे. दिवसभर झालेल्या या कारवाईत आकडे टाकून वापरण्यात आलेल्या शेगडया, हीटर व केबल जप्त करण्यात आले.

नियमीत वीजबील भरणाऱ्या वीजग्राहकांना अखंडीत व योग्यदाबाचा वीजपुरवठा व्हावा या उद्देशाने सांघिक कार्यालयाच्या निर्देशानुसार जास्त वीजहानी असलेल्या वीजवाहिन्यांवरील वीजचोरीचा पर्दाफाश करण्यासाठी लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले, अधीक्षक अभियंता प्रेमसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली बीड विभागाचे कार्यकारी अभियंता सुबोध डोंगरे यांनी धडक मोहीम हाती



घेतली असून जास्त वीजहानी असलेल्या वीजवाहिन्यांवर आकडे टाकून वीजचोरी करणाऱ्यांच्या विरोधात धडक कारवाई करण्याचे सर्व उपविभागांना निर्देश दिले आहेत. त्यानुसार गुरूवारी (दि.२१) राबविलेल्या धडक कारवाईत विभागातील आकडे टाकून वीजवापरणाऱ्यांवर कारवाई करत आकडे मुक्त परिसर मोहिम राबविण्यात आली. या धडक मोहिमेत बीड शहर उपविभागातील संशयास्पद अशा ३५, बीड ग्रामीण उपविभागातील २४, गेवराई उपविभागातील ७२, आष्टी उपविभागातील २१ तर पाटोदा उपविभागातील ०८ वीजग्राहक आकडे टाकून वीजचोरी करत असल्याचे आढळून आले. यासर्व वीजचोरांवरती वीजकायदा २००३ अनुसार कलम १३५ अन्वये कारवाई करण्यात आली असून वीजचोरीच्या बिलाची व दंडाची बीले तयार करून देण्याची कारवाई सुरू असून दिलेली बिले न भरल्यास वीजचोरीचे गुन्हे गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. या धडक कारवाईत कार्यकारी अभियंता सुबोध डोंगरे यांच्यासह बीड विभागातील सर्व अभियंते व कर्मचाऱ्यानी सहभाग नोंदवला. यापुढेही वीजचोरी विरोधातील मोहिम अधिक कडक स्वरूपात राबवली जाणार असून वीज कायद्यान्वये दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

वीजचोरी करणे हा दंडात्मक गुन्हा असून महावितरण मागेल त्याला वीजपुरवठा देण्यास बांधील आहे. आकडे टाकून वीजवापरताना जीवघेणी दुर्घटनाही होवू शकते त्यामुळे नागरिकांनी अधीकृतरित्याच वीज वापरावी. बीड विभाग हा आकडेमुक्त विभाग म्हणून ओळखला जावा यादृष्टीने यापुढेही वीजचोरी विरोधात आक्रमक कारवाईची मोहीम राबवली जाईल.– सुबोध डोंगरे, कार्यकारी अभियंता बीड विभाग

# परतुर रांजणी रोडवर अवैधरित्या जळतं लाकूड वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर वनविभागाची कारवाई

प्रतिनिधी @ जालना

परतुर नियत क्षेत्रांतर्गत वनविभागाने मोठी कारवाई करत अवैधरित्या जळतं लाकूड वाहतूक करणाऱ्या वाहनावर छापा टाकत प्रथम गुन्हा नोंद केला आहे. वनपाल मंठा व वनरक्षक मंठा यांच्या सोबत गस्त घालत असताना, परतूर ते रांजणी रोडवर ही कारवाई करण्यात आली.कारवाईदरम्यान लाल रंगाचे महिंद्रा कंपनीचे ट्रॅक्टर (क्रमांक चक-२१-ऊ-२३७१) आणि त्यास जोडलेली ट्रॉली, ज्यामध्ये कडुलिंब प्रजातीचे जळतं लाकूड अवैधरित्या वाहतूक केली जात होती, असे आढळून आले. सदर वाहनाला थांबवून चौकशी केली असता लाकूड वाहतुकीचे कोणतेही अधिकृत परवाने उपलब्ध नव्हते. त्यामुळे प्रथम गुन्हा नोंदवून रीतसर कारवाई करण्यात आली.




वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यवाही

ही कारवाई मा. वनसंरक्षक छत्रपती संभाजीनगर श्री प्रमोद चंद लाकरा व मा. उपवनसंरक्षक छत्रपती संभाजीनगर श्रीमती सुवर्णा माने मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

कारवाईचे नेतृत्व मा. सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव) जालना श्री एस.एन. मुंडे व मा. वनपरिक्षेत्र अधिकारी जालना दक्षिण (प्रादेशिक) श्री व्ही.एम. दौंड यांनी केले.संयुक्त वनपथकाची धडाकेबाज कामगिरी

कारवाईदरम्यान मा. वन परिमंडळ अधिकारी मंठा श्री एस.एन. पठाण, वनरक्षक मंठा श्री के. बी. वाकोदकर, वनरक्षक परतुर श्री एम.एम. डब्ल्यू. सय्यद व वनमजूर परतुर आत्माराम राठोड यांनी संयुक्तरीत्या सहभाग घेत धडाकेबाज कामगिरी केली.

जाहिरातदारांना विनम्र आवाहन...!

दै.समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
05 सप्टेंबर
६ वा वर्धापन दिन विशेषांक-२०२५

स.न.वि.वि.
मागील ५ वर्षांपासून मराठवाडा स्तरावर प्रकाशित होणारे शासनमान्य यादीवरील 'दै.समर्थ राजयोग' चा ६ वा वर्धापन दिन शुक्रवार दि.५ सप्टेंबर २०२५ रोजी साजरा करण्यात येणार आहे. आजपर्यंत आपल्या पाठबळावर कणखर बाणा कायम ठेवून निर्भीडपणे लिखन करत वृत्तपत्र वाचकांच्या विश्वासाला पात्र ठरले आहे. या निमित्ताने आम्ही 'वर्धापन दिन विशेषांक २०२५' चा विशेषांक प्रकाशित करत आहोत. या विशेषांकामध्ये आपल्या संस्थेची प्रतिष्ठाणची, व्यवसायाची अथवा वैयक्तिक जाहिरात देवून वृत्तपत्राला भक्कम आर्थिक साथ द्यावी ही नम्र विनंती.

जाहिरातीचे ऑनलाईन पेमेंट पाठवण्यासाठी

गुगल पे/फोन पे नंबर
9822628521
दै.समर्थ राजयोग
बँक : बँक ऑफ महाराष्ट्र
A/c No. - 60392843322
IFC Code - MAHB0001689
MICR Code - 431014303

जाहिरात दरपत्रक

| अ.क्र | विवरण | साईज | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | रंगीत | पूर्ण पान | ४०,०००/- |
| २. | रंगीत | अर्धे पान | २०,०००/- |
| ३. | रंगीत | पाव पान | १०,०००/- |
| ४. | रंगीत | शुभेच्छा | ५,०००/- |

₹5000/- ची जाहिरात देऊन वार्षिक वर्गणीदार विनामुल्य व्हा...!

जाहिरात पाठविण्यासाठी संपर्क
वैभव जगदेवी विवेक स्वामी
संपादक - मो.9822628521
दै.समर्थ राजयोग
सम्राट चौक, शाहुनगर, बीड
Email : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वाचकांना विनम्र आवाहन...!

दै.समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
05 सप्टेंबर
६ वा वर्धापन दिन विशेषांक-२०२५

रोखठोक प्रतिक्रिया पाठवण्याबाबत

दैनिक समर्थ राजयोग या शासनमान्य वृत्तपत्राचा शुक्रवार दिनांक 5 सप्टेंबर 2025 रोजी 6 वा वर्धापन दिन होत आहे. या निमित्त प्रकाशित होणाऱ्या विशेष अंकामध्ये आपण या वृत्तपत्राबद्दल आपले आलेले अनुभव, परखड मत व्यक्त करू शकता.

आपणास विनम्र विनंती आहे की, आपण कमी शब्दात आशय पूर्ण प्रतिक्रिया तात्काळ व्हाट्सअप नंबर 98 22 62 85 21 यावर आपल्या पासपोर्ट फोटोसह पाठवावी...ही विनम्र विनंती...

आपलाच
वैभव जगदेवी विवेक स्वामी
संपादक - मो.9822628521
दै.समर्थ राजयोग
सम्राट चौक, शाहुनगर, बीड
Email : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

सस्नेह निमंत्रण

दै.समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
05 सप्टेंबर
6 वा वर्धापन दिन..!

शुक्रवार दिनांक 5 सप्टेंबर 2025 रोजी शिक्षक दिनी दैनिक समर्थ राजयोग या वृत्तपत्राचा 6 वा वर्धापन दिन आहे.

या वर्धापन दिन सोहळ्यासाठी आपण खास निमंत्रित आहात.

शुक्रवार, दिनांक 5 सप्टेंबर 2025
वेळ - सकाळी 11 ते सायंकाळी 6 पर्यंत....

स्थळ : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड

टीप - स्नेही जणांना विनंती आहे की, कृपया वर्धापन दिनानिमित्त शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ स्वीकारले जाणार नाहीत. या ऐवजी इच्छेनुसार शैक्षणिक साहित्य आणावे. आपले हे शैक्षणिक साहित्य गरजवंत होतकरू विद्यार्थ्यांना दिले जाईल... धन्यवाद...

आपलाच
वैभव जगदेवी विवेक स्वामी
संपादक - मो.9822628521

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ
सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर,
सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5

## संपादकीय

# आणखी एक शस्त्र?

एखाद्या गंभीर गुन्ह्याच्या प्रकरणी अटक झाल्यास स्वत:हून आपले पद, मग ते पंतप्रधानपद असो, मुख्यमंत्रिपद असो की मंत्रिपद, सोडणे ही झाली नैतिकता; परंतु राजकारणात असे होईलच याची खात्री नाही. याला कारणे अनेक. एक तर गुन्हा सिद्ध होत नाही, तोपर्यंत आरोपींना निर्दोष मानण्याची तरतूद कायद्यात आहे.

दुसरे म्हणजे कमालीच्या स्पर्धात्मक झालेल्या राजकारणात आपला सत्तामार्ग सोपा करण्यासाठी विरोधकांना अशा गुन्ह्यांत गोवले जाऊ शकते; त्यामुळे अशा प्रकरणांना राजकीय कुरघोडीचे स्वरूप येते आणि मग आपण स्वत:हून पायउतार का व्हावे, असा प्रश्न आरोपी उपस्थित करू शकतात. तिसरा मुद्दा आहे, तो आपल्या ताब्यातील तपास यंत्रणांद्वारे सत्ताधारी त्यांना नको असलेल्यांना एखाद्या गुन्ह्यांमध्ये अडकावण्याची. शेवटचा मुद्दा म्हणजे आपल्याकडील गुन्ह्यांच्या तपासाच्या गतीचा. अटक करण्यापासून न्यायालयात खटल्याचा निकाल लागण्यापर्यंतचा कालावधी कितीही काळ लांबू शकतो. तोपर्यंत आरोपी हा निव्वळ आरोपी असतो; गुन्हेगार नाही. अशा सर्व कारणांमुळे कोणत्याही मंत्र्यांवर गुन्हेगारीचा आरोप झाला, की तो सहजासहजी पायउतार होत नाही.

पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा मंत्री यांपैकी कोणालाही गंभीर गुन्ह्यात अटक झाली आणि तीस दिवसांहून अधिक काळ त्यांना कोठडी झाली, तर त्यांना पदच्युत करण्याची तरतूद असलेले हे विधेयक आणण्यामागील सरकारचा हेतू 'स्वच्छ' आणि 'नैतिक' असल्याचे मान्य केले, तरी यामुळे सरकारच्या हातात एक शस्त्र येईल, हे नाकारता येणार नाही.

कार्यपालिका आणि न्यायपालिका या लोकशाही दोन स्तंभांतील अधिकारांचा मुद्दाही या विधेयकामुळे ऐरणीवर आला आहे. कायदा करणे हे कार्यपालिकेचे म्हणजे सरकारचे काम; तर या कायद्यांनुसार एखादा आरोपी दोषी आहे किंवा कसे हे ठरविणे हे न्यायालयांचे काम. मात्र, या विधेयकामुळे न्यायालयाच्या अधिकारात सरकारचा अधिक्षेप होण्याची शक्यता आहे; कारण सत्तेतील व्यक्तीवर गुन्हेगारीचा आरोप झाला आणि त्यासाठी तीस दिवसांची कोठडी झाली, तर तिला पदावरून हटावे लागेल. संबंधित व्यक्ती दोषी आहे की निर्दोष, याचा न्यायालयात निवाडा न होताही तिला पद गमवावे लागेल. संबंधित व्यक्ती कोठडीतून बाहेर आल्यानंतर ती त्या पदावर परत जाऊ शकते, असे हे विधेयक म्हणत असले, तरी न्यायदानाच्या प्रक्रियेला होत असलेला विलंब पाहता तिला आधीच पद सोडण्याची शिक्षा भोगावी लागेल, असे दिसते.

थोडक्यात, अशा प्रकरणात नैसर्गिक न्यायाचे तत्त्व नाकारले जाते. वास्तविक, गुन्हा सिद्ध झालेल्या लोकप्रतिनिधींच्या शिक्षेची वेगळी तरतूद असताना हे स्वतंत्र विधेयक आणण्याची गरजच नाही. तरीही ते आणले गेले आहे. त्यामुळे त्यामागे राजकारण नाहीच, असे म्हणता येत नाही. हे विधेयक सादर करताना विरोधकांनी त्याच्या प्रती फाडून केलेला गोंधळ स्वीकारार्ह नसला, तरी त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न आणि आक्षेप महत्त्वाचे ठरतात. त्यामुळे या विधेयकाची छाननीसाठी संयुक्त संसदीय समितीकडे झालेली रवानगी योग्यच म्हणावी लागेल.

# युवा ग्राम विकास मंडळ आणि ऍक्सिस टू जस्टिस फॉर चिल्ड्रन प्रकल्प अंतर्गत ग्रामीण भागातील मुला-मुलींना प्रशिक्षण



प्रतिनिधी @ बीड

आजच्या काळात समाजात वाईट घडत असलेल्या गोष्टींवर मात करण्यासाठी ग्रामीण भागातील मुला मुलींना प्रशिक्षण देणे ही काळाची गरज बनली आहे. सोशल मीडिया, मोबाईलच्या अति प्रमाणात वापरा मुळे तरुण पिढीवर वाईट परिणाम होत असलेला दिसून येत आहे. युवा ग्राम विकास मंडळ शून्य ते अठरा वयोगटातील लहान मुलं व मुली यांच्या असणाऱ्या विविध समस्या सोडवण्यासाठी कार्य करत आहे.

तसेच गुड टच बॅट टच ,बालविवाह, बाललैंगिक अत्याचार, मानवी दुर्व्यापार, बालकामगार इत्यादी विषयांवर संपूर्ण बीड जिल्हा व तालुक्यामध्ये कार्य करण्याचा उपक्रम हाती घेतले आहे. बीड तालुक्यातील विविध माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळेंवर जाऊन कर्मचारी प्रत्यक्ष मुलांना प्रशिक्षण देत आहेत त्याचबरोबर बालविवाह म्हणजे काय ? बालविवाहाचे दुष्परिणाम ,शिक्षा चे स्वरूप, बालविवाह कायदा आणि आपली काय भूमिका असावी, बालविवाह झालाच तर रिपोर्ट कुठे कुठे करता येतो व २००६ अधिनियमानुसार गुन्हा कोण कोण दाखल करू शकतो इत्यादी विषयी सविस्तर मार्गदर्शन मुलांना व मुलींना देण्यात येत आहे.त्याचबरोबर बालविवाहाची शपथ ही घेण्यात येत आहे.हे प्रशिक्षण महालक्ष्मी माध्यमिक विद्यालय शिदोड तालुका जिल्हा बीड या ठिकाणी पार पडले. प्रशिक्षक मनीषा स्वामी यांनी बालविवाह व त्या संदर्भातली संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना दिली आणि स्नेहा मस्के यांनी लैंगिक अत्याचार अधिनियम २०१२ याविषयी मुलांना व मुलींना सविस्तर असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक चव्हाण सर तसेच शिक्षिका साळुंके मॅडम व काटे मॅडम तसेच गावातील आशा वर्कर जोगदंड मॅडम व रंधवे मॅडम यांनीही मार्गदर्शन केले व वेळो वेळी विद्यार्थ्यांना असेच मार्गदर्शन व्हावे ही अपेक्षाही व्यक्त करून आभार व्यक्त केले आहेत.

# आता तिरुपती हॉस्पिटलमध्ये महात्मा फुले योजनेअंतर्गत होणार सर्व प्रकारच्या पूर्णपणे मोफत शस्त्रक्रिया

## शासनाच्या आरोग्य योजनेचा लाभ घेण्याचे मनका विकार तज्ञ डॉ बालाजी नवले यांचे आवाहन

प्रतिनिधी @ बीड

बीड शहरात सहा महिन्याभरापूर्वी सुरू झालेले सुप्रसिद्ध मनका विकार तज्ञ तथा अस्थिरोग तज्ञ डॉ बालाजी नवले यांच्या तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल आणि स्पाईन केअर सेंटर नगर नाका बीड येथे शासनाची महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना सुरू झालेली आहे.. गरजू रुग्णांना एक रुपयाही खर्च न करता पूर्णपणे मोफत असणाऱ्या या शासनाच्या योजनेचा सर्व प्रकारच्या रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन तिरुपती हॉस्पिटलचे संचालक तथा मनकाविकार,अस्थिरोगतज्ञ डॉ बालाजी नवले यांनी केले आहे. तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलमध्ये हाडासंबंधी, पोट विकार, मूत्रविकार, हृदयरोग,मधुमेह, कान, नाक ,घसा संबंधी सर्व योजनेमध्ये लागू असलेल्या सहभाग या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया आणि उपचार होणार आहेत.. तरीही गरजू रुग्णांनी तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल कागदपत्रासह येऊन लाभ घेण्याचे आवाहन तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल आणि स्पाईन केअर सेंटर नगर नाका बीड ..च्या वतीने मनका विकास डॉ बालाजी नवले यांच्या वतीने करण्यात आले आहे कर्ज रुग्णांनी अपॉइंटमेंट साठी ७७७०००३२२९,८६६८२१२३३१ या दूरध्वनीवर संपर्क साधून हॉस्पिटलमध्ये विजिट करावी असे हॉस्पिटलच्या वतीने कळविण्यात आले आहे..!

# बीड शहरात सामूहिक हनुमान चालीसा निमित्ताने हिंदू युवकांचे एकत्रिकरण - किशन चौहान, प्रशांत डोरले

प्रतिनिधी @ बीड





राज्यात गाजणारा कुठलाही विषय असला तरी त्याची सुरुवात ही बीडच्या मातीतून झालेली असते, बीड जिल्ह्यात आजपर्यंत हिंदुत्ववाशी संबंधित विविध संघटना, प्रमुख नेतृत्व, युवकांचे टीम काम करत आहेत. यातूनच बीड शहरात राज्यात गाजलेली प्रभु श्रीराम जन्मोत्सव, भव्य महिलांची कावड यात्रा, विविध महापुरुषांच्या जयंती उत्सव सारख्या अनेक प्रेरणादायी महोत्सवांच्या माध्यमातून समाज प्रबोधनसोबतच एक चळवळ उभी करण्यात आलेले आहे, त्याच प्रमाणे बीड शहरातील समस्त राष्ट्रप्रेरित विचारांच्या युवकांनी एकत्रित बैठक घेत सामूहिक हनुमान चालीसा पठण कार्यक्रम घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

हिंदु धर्माच्या दृष्टीने पवित्र समजल्या जाणाऱ्या श्रावण महिन्याचा शेवटचा दिवस व शनिची उपासना करण्याचा उत्तम दिवस समजल्या जाणारा शनि अमावास्या अश्या दुर्लभ योग येत्या शनिवारी दिनांक २३ ऑगस्ट रोजी येत असल्याने या दिवशी भगवान महाबली हनुमानाचे उपासना केल्याने पुण्य लाभते अशी हिंदू धर्मात मान्यता आहे, याच दिनाचे पर्व साधून शहरातील राष्ट्रप्रेरित विचारांच्या युवकांनी सामूहिक हनुमान चालीसा पठण कार्यक्रम घेण्याचे योजिले आहे. या कार्यक्रमास शहरातील ११०० युवक, महिला, विद्यार्थी, प्रौढ हिंदु बांधव सहभागी होणार असुन शहरातील पेठ बीड भागातील हिरालाल चौकात याची जय्यत तयारी करण्यात येत आहे. या निमित्ताने शहरात हिंदु विचारांच्या युवकांना एकत्रित करून एक दिशा देऊन कार्य करण्याचा संकल्प केला जाणार असून यातून राष्ट्रहित साधण्यासाठी युवकांची मनात राष्ट्रचेतना जागृत करण्यात येणार असल्याचे प्रसिद्धी पत्रकाद्वारे किशनसिंग चौहान, प्रशांत डोरले यांनी सांगितले आहे.

## अध्यात्म सोबतच धर्म नेतृत्व देणार युवकांना दिशा

**बीड शहरात होणाऱ्या या कार्यक्रमास जिल्ह्यातील आध्यात्मिक क्षेत्रातील प्रमुख साधुसंत, महंत, गुरुवर्य सोबतच हिंदू धर्माच्या कार्यात सदैव सक्रीय असणारे आ. संजय केणेकर हे प्रमुख उपस्थित राहणार असून युवकांना या व्यासपीठावरून धर्मकार्य करताना अध्यात्माचे ज्ञान ही मिळणार आहे.**

# भजनी मंडळाना साहित्य खरेदीसाठी २५००० रुपये मिळणार, अनुदानासाठी अर्ज कसा करायचा?

मुंबई : महाराष्ट्राच्या सांस्कृतिक कार्य विभागाकडून सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांना अनुदान दिलं जातं. २०२५ पासून गणेशोत्सवाला महाराष्ट्राचा राज्य महोत्सव म्हणून दर्जा देण्यात आला आहे. गणेशोत्सव या राज्य महोत्सवांतर्गत भजनी मंडळांना मिळणार भांडवली अनुदान देण्यात येणार असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांनी दिलं आहे. राज्यतील १८०० भजनी मंडळांना भजन साहित्य खरेदीसाठी २५००० रुपये भांडवली अनुदान दिलं जाणार आहे




भजन साहित्य खरेदीसाठी अनुदान

यावर्षीपासून प्रथमच गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा देण्यात आलेला आहे. यानिमित्ताने राज्यात विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि उपक्रमांचे आायोजन करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून राज्याभरातील १८०० भजनी मंडळांना भजन साहित्य खरेदीसाठी २५००० रुपये भांडवली अनुदान वितरण करण्यात येणार आहे, असा निर्णय सांस्कृतिक कार्य विभागानं घेतल्याची माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांनी दिली.

१४ ऑगस्टच्या शासन निर्णयानुसार राज्यातील नोंदणीकृत तसेच भजन क्षेत्रातील शिखर संस्थांनी प्रमाणित केलेल्या भजनी मंडळांना भांडवली खर्चासाठी अनुदान देण्यात येणार आहे. या संदर्भातील अटी व शरतींचा शासन निर्णय स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील. यासाठी ५ कोटी रुपये इतकी तरतूद करणे, असा उल्लेख त्या शासन निर्णयात होता.

ऑनलाईन अर्ज करावा लागणार

भजनी मंडळांना २५ हजार रुपयांचं अनुदान मिळवण्यासाठी https://mahaanudan.org या वेबसाईटवर अर्ज दाखल करावे लागतील. याबाबतचे ऑनलाईन अर्ज दिनांक २३ ऑगस्ट, २०२५ ते ०६ सप्टेंबर, २०२५ या कालावधीत र्हीीिं://ारहरर्पीवरप.ीस या वेबपोर्टलवर उपलब्ध आहेत. जास्तीत जास्त भजनी मंडळांनी या अनुदानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांनी केले आहे.

अर्ज कसा करायचा?

महाराष्ट्रातील ज्या भजनी मंडळांना भजनाचं साहित्य खरेदी करण्यासाठी २५ हजार रुपयांचं अनुदान मिळवायचं असेल त्यांना पहिल्यांदा https://mahaanudan.org या वेबसाईटला भेट देऊन अर्ज करावा लागेल. अर्ज सादर करताना प्रथम नोंदणी करावी लागेल. यासाठी भजनी मंडळ कोणत्या प्रशासकीय विभागातील आहे हे निवडावं लागेल, त्यानंतर जिल्हा, तालुका निवड केल्यानंतर गाव किंवा नगर पालिका, नगर पंचायत निवड करावी लागेल. यानंतर भजनी मंडळाचं नाव, भजनी मंडळाचा पत्ता आणि मोबाईल क्रमांक, ईमेल आयडी नोंदवावा लागेल. यानंतर लॉगीन करुन अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी लागेल.

# भटक्या कुत्र्यांवरील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे राजकारण्यांकडून स्वागत!

प्रतिनिधी । बीड

मुंबई : सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली-एनसीआरमधील भटक्या कुत्र्यांबाबतच्या आपल्या पूर्वीच्या निर्देशात बदल केला आहे. नवीन नियमानुसार, भटक्या कुत्र्यांना लसीकरण, 'डिवॉर्मिंग' आणि निर्जंतुकीकरण केल्यानंतर सोडण्याची परवानगी आहे, परंतु आक्रमक किंवा 'रेबीज' असलेल्या कुत्र्यांना सोडण्यावर बंदी कायम ठेवली आहे. मुंबईतील राजकारण्यांनी या नवीन आदेशाचे स्वागत केले आहे.

भाजप आमदार राम कदम यांनी या निर्णयाचे कौतुक केले. ते म्हणाले, न्यायालयाने यापूर्वी भटक्या कुत्र्यांमुळे जनतेला होणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी आदेश दिले होते. त्यांनी सांगितले की, नवीन नियमाचे सर्वांनी स्वागत केले पाहिजे, कारण ते सार्वजनिक सुरक्षा आणि प्राणी कल्याण यांच्यात संतुलन साधते.

सर्वोच्च न्यायालयाच्या नवीन नियमांनुसार, भटक्या कुत्र्यांना कायमस्वरूपी बंदिस्त ठेवू नये. या नियमानुसार, या प्राण्यांना सार्वजनिक ठिकाणी खाऊ घालण्यावर बंदी आहे आणि त्याऐवजी त्यांच्यासाठी निर्दिष्ट 'फिडिंग एरिया' तयार करणे आवश्यक आहे.

शिवसेना आमदार मिलिंद देवरा यांनी 'एक्स'वर (पूर्वीचे ट्विटर) सुधारित आदेशाला पाठिंबा दिला, आणि सुचवले की मुंबई आपल्या भटक्या कुत्र्यांची लोकसंख्या व्यवस्थापित करण्यासाठी उर्वरित भारतासाठी एक आदर्श म्हणून काम करू शकते.

त्याचप्रमाणे, शिवसेना नेते संजय निरुपम यांनीही या निर्णयाचे स्वागत केले. त्यांनी कुत्र्यांच्या प्रेमींच्या भावना मान्य केल्या, त्याचबरोबर आक्रमक कुत्र्यांमुळे होणाऱ्या त्रासावरही लक्ष वेधले.



ते म्हणाले की, कुत्र्यांना सोडण्यापूर्वी लसीकरण आणि निर्जंतुकीकरण करण्याचे न्यायालयाचे आवाहन सार्वजनिक संरक्षणासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे.राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये कुत्र्यांच्या चाव्याच्या वाढत्या घटनांना प्रतिसाद म्हणून भटक्या कुत्र्यांसाठी एक राष्ट्रीय धोरण तयार करण्याचे काम सुरू आहे. नवीन निर्देशानुसार, राज्य सरकारांना उल्लंघनांची तक्रार करण्यासाठी एक 'हॉटलाइन' स्थापित करणे आवश्यक आहे. हा नियम मुंबईतील प्राणी हक्क गट आणि कुत्र्यांना खाऊ घालणाऱ्यांच्या मध्ये ऑगस्टमध्ये झालेल्या आंदोलनानंतर आला आहे.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांकः ६८७/२०२५**
**नारायण ज्ञानेश्वर लेंडाळे विरुद्ध निरंक**
**(मार्फत-अँड. ए बी बांगर )**

ज्याअर्थी मयत नामे ज्ञानेश्वर गंगाराम लेंडाळ हे दिनांक १५.०५.२०२० रोजी दैठण ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार नारायण ज्ञानेश्वर लँडाळ वय २२ वर्षे धंदा - शेती रा. दैठण ता. गेवराई जि. बीड

शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या गोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे ज्ञानेश्वर गंगाराम लेंडाळ रा. दैठण ता. गेवराई, जि. बीड याचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०७.१०.२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २३ सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६६१/२०२५**
**निर्मला व इतर वि निरंक**
**(मार्फत -ॲड. एम. वाय. इनामदार, गेवराई)**

ज्याअर्थी मयत दिनकर पि. गणपतराव मुळे रा. धोंडराई ता. गेवराई जि. बीड हे दिनांक १०/०१/२०२१ रोजी धोंडराई ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार क्र. १ निर्मला भ्र. दिनकरराव मुळे, वय - ६५ वर्षे, धंदा नौकरी, रा. मादळमोही ता. गेवराई जि. बीड, ह. मु. धोंडराई ता. गेवराई जि. बीड अर्जदार क. २ दिलीप पि. दिनकरराव मुळे, वय - ५० वर्षे, धंदा शेती, रा. मादळमोही ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. ३ सचिन पि. दिनकरराव मुळे, वय ४१ वर्षे, धंदा - शेती, रा. मादळमोही ता. गेवराई जि. बीड ह. मु. धोंडराई ता. गेवराई जि. बीड यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत दिनकर पि. गणपतराव मुळे रा. धोंडराई ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक /०८/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख १५/०९/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७०७/२०२५**
**शेषेराव बापुराव पांढरे विरूध्द निरंक**
**(मार्फत - ॲड. आर. व्हि.आव्हाड, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे बापुराव पि.गोविंदराव पांढरे हे / हया दिनांक २१/४/२००२ रोजी मौजे रेवकी, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत.

अर्जदार क्र.१ शेषेराव पि.बापुराव पांढरे, वयः ६५वर्षे, धंदाः शेती, राः रेवकी, ता. गेवराई, जि. बीड, २. केशव पि.बापुराव पांढरे वयः ६२ वर्षे, धंदा शेती, रा. रेवकी, ता. गेवराई, जि. बीड, ३. पंडित पि.बापुराव पांढरे, वयः ५५ वर्षे, धंदा शेती, रा. रेवकी, ता. गेवराई, जि. बीड ४. संताबाई भ्र. बाबासाहेब शिंदे, वयः ५८वर्षे धंदा घरकाम व शेती. रा :विहामांडवा ता.पैठण जि.छ. संभाजीनगर ५. मधुकर पि. करभारी राजगे, वयः ४० वर्षे धंदा :शेती, राः पिंपळवाडी पिराची, ता. पैठण जि.छ. संभाजीनगर यांनी शासकीय/नमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार व यांना सदर मयत बापुराव पि.गोविंदराव पांढरे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २१/०८/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०१ / १० / २०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२७१ दि.१८.०८.२०२५**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान/श्रीमती स्वाती लक्ष्मण सोळुंके, रा.दहिपुरी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | स्वाती लक्ष्मण सोळुंके | स्वतः | २४.०८.२००६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १८/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# बाबर नगर, शंकर नगरचे नाव प्रभाग रचनेतून वगळल्याबाबत नागरिकांचा आक्षेप

## नगरपरिषद अंबडला निवेदन

अंबड / फारुक शेख

अंबड शहरातील प्रभाग क्रमांक ०१ मधील बाबर नगर व शंकर नगर या वसाहतींचे नाव अलीकडेच जाहीर झालेल्या प्रभाग रचनेच्या आराखड्यातून वगळण्यात आल्याने परिसरातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. याबाबत दिनांक २० ऑगस्ट २०२५ रोजी नागरिकांनी नगरपरिषद अंबडचे माननीय मुख्याधिकारी यांना अधिकृत तक्रार निवेदन सादर केले.

निवेदनात म्हटले आहे की, सन १९८० पासून बाबर नगर (ले-आऊट क्र. १८७७-१) व शंकर नगर या ठिकाणी ४५ ते ५० वर्षांपासून नागरिक स्थायिक असून, त्या पत्त्यावर शासकीय सोयीसुविधा - पाणी, वीज, रेशन कार्ड, मतदान ओळखपत्रे, आदी प्राप्त होत आहेत. मात्र, १८ ऑगस्ट २०२५ रोजी अंबड नगरपरिषदेतर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिसूचनेच्या परिशिष्ट -८ नुसार जाहीर करण्यात आलेल्या प्रभाग रचनेत बाबर नगर व शंकर नगरचा उल्लेख करण्यात आलेला नाही.या अधिसूचनेत प्रभाग क्रमांक ०१ मध्ये बाबर नगरचा उल्लेख 'सर्वे नंबर ३८' या स्वरूपात करण्यात आल्याने, या वसाहतीचे वास्तवात असलेले नाव व ओळख अदृश्य झाली आहे. यामुळे पुढील काळात नागरिकांना प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे.विद्यमान नगरसेविका सौ. अंसाबाई तात्याराव बाबर या देखील याच प्रभागातून निवडून आल्या असून, त्यांनी देखील या वसाहतीसाठी वेळोवेळी कामे केली आहेत. त्यामुळे या वसाहतींची ओळख टिकवण्यासाठी त्या परिसराचे मूळ व प्रचलित नाव - बाबर नगर व शंकर नगर - प्रभाग रचनेत स्पष्टपणे नमूद करणे गरजेचे असल्याचा आग्रह नागरिकांनी धरला आहे.

या निवेदनाची प्रत मा. जिल्हाधिकारी, जालना, मा. उपविभागीय अधिकारी, अंबड, व मा. तहसीलदार, अंबड यांच्याकडेही सुपूर्त करण्यात आली आहे.नागरिकांचे म्हणणे आहे की, प्रभाग रचनेतून कॉलनी,नगर, गल्ली यांची नावे वगळल्यामुळे ओळखीचा गोंधळ होतो व शासकीय कागदपत्रे, सुविधा मिळवताना अडचणी येतात. त्यामुळे बाबर नगर व शंकर नगर यांचे प्रचलित व जुने नाव कायम ठेवून त्याचा स्पष्ट समावेश प्रभाग रचनेत करण्यात यावा.नागरिकांनी वसाहतीच्या ओळखीच्या अस्तित्वासाठी आपला आवाज बुलंद करत प्रभाग रचनेतील त्रुटी दूर करण्याची मागणी केली

# विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांनी घेतला बीड जिल्ह्याचा आढावा

प्रतिनिधी @ बीड



दिनांक २२ ऑगस्ट २०२५ रोजी विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांनी बीड जिल्हा पोलीस दलाची आढावा बैठक घेतली. यावेळी जिल्ह्यातील प्रत्येक विनाउघड गुन्ह्यांचा आढावा घेऊन सदर गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी विशेष प्रयत्न करण्याच्या सुचना देण्यात आल्या.

आगामी काळात साजरे होणारे ईद-ए-मिलाद, गणेशोत्सव सणांच्या अनुषंगाने मिरवणूक मार्ग, विसर्जन मार्गाचे प्रभारी अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी करून अडथळे असल्यास ते दुर करावे. सराईत गुन्हेगारांवर तात्काळ प्रतिबंधक कारवाई करावी. मागील वर्षी गणेशोत्सवात दाखल गुन्ह्यांची तात्काळ निर्गती करावी. आपल्या पोलीस स्टेशन हद्दीत डी.जे. ला अजिबात परवानगी देऊ नये. डी.जे. वाजविल्यास कायदेशीर कारवाई करावी. धार्मिक स्थळावरील भोंग्यांबाबत शासनाकडून आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कारवाई करावी. अशा सुचना श्री. वीरेंद्र मिश्र, विशेष पोलीस महानिरीक्षक, छ. संभाजीनगर परिक्षेत्र यांनी सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना दिल्या.

तसेच आगामी गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद च्या अनुषंगाने शांतता समितीची बैठक घेण्यात आली. तसेच जिल्ह्यातील पोलीस अधिकारी यांच्या अडचणी जाणून घेतल्या.जिल्ह्यातील आगामी सण उत्सव शांततेत, निर्विघ्न व उत्साहपूर्ण वातावरणात साजरे होतील यासाठी सर्व प्रभारी अधिकारी यांनी कटिबद्ध असायला हवे. तसेच डि.जे. मुक्त धोरण कायम राहीले पाहीजे. बदलत्या काळानुसार पोलीसांनी -ख तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर दैनंदिन कामकाजात केला पाहीजे असे प्रतिपादन श्री. वीरेंद्र मिश्र, विशेष पोलीस महानिरीक्षक, छ. संभाजीनगर परिक्षेत्र यांनी केले.

# बीड शहर हद्दीत कोरडे गणेश मंडळ ठरले सर्वोत्तम गणेश मंडळ

## गणेश उत्सव २०२४ पारितोषिक वितरण संपन्न

प्रतिनिधी @ बीड



पोलिस अधीक्षक कार्यालयात संपन्न झालेल्या बैठकीत गेल्या वर्षी पार पडलेल्या बीड शहर हद्दीतील गणेश उत्सव मधील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गणेश मंडळांना प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक असे मानांकन आणि मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. पारितोषिक वितरण पोलिस अधीक्षक श्री नवनीत काँवत आणि अपर पोलिस अधीक्षक श्री. सचिन पांडकर यांचे हस्ते देण्यात येऊन गणेश मंडळांचा सत्कार करण्यात आला.

पर्यावरणपूरकता, उत्साहवर्धक, समाजाभिमुख, सुंदरता, ध्वनीप्रदूषण मुक्त हे निकष ठेवण्यात आले होते. कोरडे गणेश मंडळ, काळे गल्ली, सर्वाधिक चांगली काम करत कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर विघ्नहर्ता गणेश मंडळ, पाटण गल्ली यांनी द्वितीय क्रमांक पटकावला आहे. तर तृतीय क्रमांक कालिका गणेश मंडळ बलभीम चौक या गणेश मंडळांनी पाठवला आहे. डीजे मुक्त गणेशोत्सव, टाळ मृदंग, ढोल ताशाचा वापर, समाजाभिमुख देखावे, टाकाऊ पासून टिकाऊ असं डेकोरेशन, कमीत कमी किमतीमध्ये देखणं सजावट, ध्वनी प्रदूषण मुक्त संपूर्ण गणेश उत्सव, गणवेश वाटप सोशल मीडियावरील प्रेझेंटेशन.असे विविध कार्यक्रम या गणेश मंडळाद्वारे घेण्यात आले होते. इतरही गणेश मंडळांना प्रोत्साहन भेटावे, उत्साह राहावा , गणेशोत्सव अधिक देखणा व्हावा यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. याही वर्षी याच प्रमाणे गणेश मंडळांची निवड होणार आहे.

# सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना घरगुती दराने वीजपुरवठा

## विघ्नहर्त्याचा उत्सव अधिकृत वीजजोडणी घेवूनच निर्विघ्नपणे पार पाडावा- महावितरणचे आवाहन

प्रतिनिधी @ बीड



गणेशोत्सव व त्यापाठोपाठ येणाऱ्या नवरात्र उत्सवासाठी महावितरणकडून तात्पुरती वीजजोडणी देण्यात येत आहे. तसेच या तात्पुरत्या जोडणीच्या वीजवापरासाठी घरगुती वीजदर आकारण्यात येणार आहे. त्यामुळे सार्वजनिक गणेश मंडळांनी अधिकृत वीजजोडणी घेवूनच विघ्नहर्त्याचा उत्सव आनंदात साजरा करावा असे आवाहन लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री अरविंद बुलबुले यांनी केले आहे.

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने महावितरणच्या अखत्यारीतील सर्व धर्मीयांच्या सार्वजनिक उत्सवांना तात्पुरत्या वीजजोडणीसाठी घरगुती वीजुरवठयाच्या वीज दरानेच वीजदर निश्चित केले आहेत. त्यामुळे अनधिकृत वीज जोडणी टाळून गणेश उत्सव व इतर सार्वजनिक उत्सवा करिता अधिकृत वीजपुरवठा घ्यावा. गणेशोत्सवाच्या कालावधीत पावसाची शक्यता असल्याने गणेश मंडळांनी संभाव्य धोके टाळण्यासाठी वीजयंत्रणेची योग्य काळजी घ्यावी. मंडपाची व रोषणाईसाठी विद्युत व्यवस्था व संच मांडणी ही अधिकृत विद्युत कंत्राटदारांकडूनच करून घेणे आवश्यक आहे. गणेश उत्सव मंडपातील वीजयंत्रणेचे अर्थिंग सुस्थितीत असल्याची खात्री करून घ्यावी. मंडळाच्या अंतर्गत वायरचे इन्सूलेशन खराब झाल्यास अशा वायर्समधून मंडपाच्या लोखंडी पत्र्यांमध्ये किंवा ओल्या वस्तुंमध्ये विद्युत प्रवाह येऊ शकतो. हा प्रकार टाळण्यासाठी वायर्सचे जोड काढून टाकावेत किंवा जोड द्यायचा असल्यास योग्य क्षमतेच्या इन्सूलेशन टेपने जोड देण्यात यावा. स्वीचबोर्डच्या मागे प्लायवूड किंवा लाकडी फळी लावल्याची खात्री करून घ्यावी.

गणेशोत्सवात वीजपुरवठा आणि जनरेटरसाठी स्वतंत्र न्यूट्रल घेणे अत्यावश्यक आहे. काही कारणास्तव वीजपुरवठा बंद असताना जनरेटर सुरु केल्यास एकाच न्यूट्रलमुळे जनरेटरमधील वीजप्रवाह लघुदाब वीजवाहिनीमध्ये प्रवाहित होतो व त्यातून जीवघेण्या अपघाताची शक्यता निर्माण होते. मंडपातील वीजयंत्रणेसह सार्वजनिक ठिकाणी लावलेल्या लाईटिंगचे वायर्स खाली झुकलेले नाही किंवा विस्कळीत झालेले नाहीत याची दैनंदिन तपासणी करावी.

गणेशोत्सवाच्या काळात मंडपात शॉर्टसर्कीट होणे, विद्युत वायरिंगमध्ये बिघाड होणे आदी कारणांमुळे संभाव्य धोके टाळण्यासाठी सर्व गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधीत क्षेत्रातील महावितरणचे अभियंता व कर्मचारी यांचे भ्रमणध्वनी क्रमांक नोंदवून ठेवावेत. तसेच तक्रारींसाठी किंवा तातडीच्या मदतीची गरज भासल्यास २४ तास उपलब्ध असलेले १९१२ किंवा १८००२१२३४३५ किंवा १८००२३३३४३५ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

# मुला - बाळाच्या भविष्यासाठी अनुसूचित जमातीच्या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रास हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा - बळीराजे वाघमारे

प्रतिनिधी @ बीड



आदिवासी जननायक भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून दिनांक - २४/०८/२०२५ व दि. २५/०८/२०२५ रोजी दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती आदिवासी विकास मंत्री अशोकजी उईके , मंत्री नरहरी झिरवळ, मा. मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या सह आधिकारी वर्ग, जेष्ठ अभ्यासक यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे तरी या चर्चासत्रास गाव, वाड्या, वस्ती वरील अनुसूचित जमातीच्या बांधवांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कोळी राष्ट्रसंघ चे महाराष्ट्र अध्यक्ष श्री. बळीराजे वाघमारे यांनी केले आहे. अनुसूचित जमातीला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी या विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे बीड जिल्ह्यातील कोळी महादेव, भिल्ल, पारधी, ठाकर, ठाकुर, अंध आदि जमातीतील बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कोळी राष्ट्रसंघ चे महाराष्ट्र अध्यक्ष श्री. बळीराजे वाघमारे, आर. जी. माने, जनकजी तपसे, आर. डी. वाघमारे, संजय मोरे, रवी दहिभाते, वैभव होळकर, दत्ता माने, दत्ता कांबळे, दादासाहेब कांबळे, रविंद्र देवरवाडे, बाबासाहेब यशवंत, अशोक कोळी, गणेश दसवंते, राजाभाऊ सावंत, मुकुंद वाघमारे, सुरेन्द्र जगताप, संजय तपसे, राजाभाऊ यशवंत, प्रतीक यशवंत, बाळासाहेब झेलाजी, आमोल वाघमारे, तुकाराम वाघमारे, मनोज गायकवाड, भागवत कांबळे, सुनील यशवंत आदी अवाहन केले आहे.

# डोईफोडवाडी येथे महंत ह भ प आप्पासाहेब चौरे महाराज यांचे कीर्तन संपन्न

प्रतिनिधी @ बीड




बीड तालुक्यातील डोईफोडवाडी येथील अखंड हरिनाम सप्ताहामध्ये सातव्या दिवशीची कीर्तन सेवा महंत आप्पासाहेब चौरे महाराज मठाधिपती श्रीक्षेत्र चोंडी यांचे अमृततुल्य अशा स्वरूपाचे कीर्तन संपन्न झाले.डोईफोडवाडी मध्ये धार्मिक सामाजिक कार्यक्रम सतत होत असतात. त्या कार्यक्रमापैकीच हा अखंड हरिनाम सप्ताह आहे. यामध्ये मार्ग दाऊनी गेले आधी दयानिधी संत ते या अभंगावर महाराजांनी उत्कृष्ट अशा स्वरूपाचे पूर्ण पूर्ण आध्यात्मिक असे किर्तन केले.यावेळी बोलताना महाराज म्हणाले की,जीवनामध्ये वाटा अनेक आहेत, रस्ते अनेक आहेत परंतु काही रस्ते पथनाकडे घेऊन जातात त्या रस्त्याने जाणे म्हणजे नुकसान आहे, दुःख आहे आणि हे दुःख जर संपवायचे असेल होणारा त्रास टाळायचा असेल तर संतांनी जो मार्ग सांगितला आहे.त्या मार्गानेच मार्गक्रमण करून आत्मशांती प्राप्त करून घ्यावी. यावेळी निरूपण करत असताना महाराज म्हणाले की, अभिमान व अहंकार हा माणसाला पथनाकडे घेऊन जातो आणि हे सांगत असताना अनेक उदाहरणे दिली व लोकांना मंत्रमुग्ध करून सोडले याप्रसंगी गावातील तरुण वर्ग , प्रतिष्ठित नागरिक, महिला पुरुष व सानपवाडी , सोनपेठ, येळंबघाट, दहिफळ वडमाऊली, निवडुंग वाडी येथील मंडळी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होती अशी माहिती मा सरपंच तात्यासाहेब डोईफोडे सर

# ज्येष्ठ कार्यकर्तीच्या पतीचे दुःखद निधन; ना. पंकजाताई मुंडेंनी लंडन वरून फोन करुन केले सांत्वन

## भाजपच्या तालुका उपाध्यक्ष रंजनाताई काळम यांना पतीशोक

प्रतिनिधी @ अंबाजोगाई

भाजपच्या तालुका उपाध्यक्ष रंजनाताई काळम यांचे पती सुधाकरराव काळम यांच्या दुःखद निधनाबद्दल राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी लंडन वरून फोन करुन काळम परिवाराचे सांत्वन करत त्यांना धीर दिला. भाजपच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या तथा तालुका उपाध्यक्ष रंजनाताई काळम यांचे पती सुधाकरराव हे गेल्या काही दिवसांपासून आजारी होते, आजारपणातच त्यांचे आज सायंकाळी दुःखद निधन झाले. अतिशय मनमिळावू असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते.

ना. पंकजाताई मुंडे यांना त्यांच्या निधनाची बातमी कळताच त्यांनी तातडीने लंडन येथून रंजनाताईंना मोबाईल वरून संपर्क साधला आणि त्यांचे सांत्वन केले तसेच धीरही दिला. नेता कितीही दूर अंतरावर असला तरी आपल्या कार्यकर्त्यांची काळजी व त्यांच्या कुटुंबियां विषयी असलेली तळमळ हेच ना.पंकजाताईंच्या कृतीतून सिध्द होते.

# आज रामदेवबाबा बीज जन्मोत्सव व जम्मा जागरण सोहळा

प्रतिनिधी @ बीड

श्री. बाबा रामदेवजी मंदिर संस्थान विप्रनगर बीड येथे आज दि. २५ ऑगस्ट २०२५ रोजी श्री रामदेवजी बाबा जन्मोत्सव मोठ्या उत्साही व आनंदी वातावरणात संपन्न होणार आहे. सायंकाळी ५ ते ७ विष्णू सहस्रनाम सामूहिक पाठ. सकाळी ६.०० ते दुपारी १२:३० पर्यंत महाअभिषेक, भजन, आरती, जन्मोत्सव व रात्री ८.३० वा. श्री रामदेव बाबा भजनी मंडळाच्या वतीने जम्मा जागरणाचा कार्यक्रम होणार आहे. उपरोक्त सर्व कार्यक्रम श्री बाबा रामदेव मंदिर संस्थान, वैष्णो देवी मंदिर, विप्रनगर बीड येथे संपन्न होणार आहे. तर २५ ऑगस्ट रोजी दुपारी १२ ते ४ या दरम्यान महाप्रसादाचे आयोजन माँ वैष्णो पॅलेस, एम.आय.डी.सी. बीड. येथे करण्यात आलेले आहे. सर्व भरगच्च कार्यक्रमाचा लाभ सर्व भक्तगणांनी घ्यावा असेळ आवाहन श्री बाबा रामदेवजी मंदिर संस्थान बीड व यजमान चंद्रप्रकाश गोविंदरामजी सेठी व सेठी परिवार बीडच्या वतीने करण्यात आलेले आहे.

# बीड जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी अंतिम प्रभाग रचना जाहीर

प्रतिनिधी @ बीड

राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिव यांच्या १२ जून २०२५ रोजीच्या आदेशानुसार बीड जिल्हा परिषदेच्या ६१ निवडणूक विभाग आणि त्याअंतर्गत निर्वाचक गणात गेवराई-१८, माजलगाव-१२, वडवणी-०४, बीड-१६, शिरुर कासार-०८, पाटोदा-०६, आष्टी-१४, केज-१४, धारुर-०६, परळी-१२ आणि अंबेजोगाई-१२ अशा एकूण जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांच्या १२२ निर्वाचक गणासाठी निवडणूक प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

त्यानुसार आज दि. २२ ऑगस्ट २०२५ रोजी अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिद्ध होणार आहे. ही अधिसूचना बीड जिल्हाधिकारी कार्यालय, बीड जिल्हा परिषद कार्यालय, सर्व उपविभागीय कार्यालये, सर्व तहसील कार्यालये आणि सर्व पंचायत समिती कार्यालयांतील फलकांवर नागरिकांच्या अवलोकनासाठी उपलब्ध असेल. सर्व संबंधितांनी अंतिम प्रभाग रचनेचे अवलोकन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

# कु.धनश्री राऊत चि एमबीबीएस साठी निवड झालेबद्दल तिचा डावरे यांचेकडून सत्कार

प्रतिनिधी @ माजलगांव

कु.धनश्री रविंद्र राऊत रा.कवडगाव बु.ता.वडवणी ह.मु.माजलगाव हि वैद्यकीय शिक्षणासाठी मेडिकल कॉलेज अंबाजोगाई येथे पात्र झाली आहे.कु.धनश्री राऊत एमबीबीएस शिक्षणक्रमांस अंबाजोगाई येथील महाविद्यालयात गुणवत्तेनुसार प्रवेशपात्र ठरली, ही निश्चितच अभिमानाची बाब आहे.

आतापर्यन्त कवडगाव(बु) ता.वडवणी येथील चार विद्यार्थी मेडिकलचे शिक्षण घेत आहेत.याच गावातील पोलीस खात्यात २०ते २२ युवक कार्यरत आहेत. आता ट्रॅक बदलून मुले वैद्यकीय शिक्षणकडे येत आहेत,ही आनंदाची बाब आहे.कु.धनश्री राऊतने अतिशय मेहनत जिद्द चिकाटीने स्वयं अध्ययनातून तिने हे यश मिळविले आहे.तिने दहावीपर्यंत मॉडेल इंग्लिश स्कुल,माजलगाव येथे शिक्षण पूर्ण केले तर बारावीचे शिक्षण लोकनेते सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव येथे पुर्ण केले.हे यश मिळाल्याने तिचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.तसेच पुढील शिक्षणासाठी डावरे सर व आबासाहेब डावरे यांच्याकडून शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.ती पत्रकार रविंद्र राऊत याची मुलगी आहे.



# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ मदतीची गरज; शिवसेनेचे खा.संजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी @ जालना

जालना जिल्ह्यातील परतूर, मंठा, अंबड, घनसावंगी आणि इतर तालुक्यांमध्ये झालेल्या भीषण अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर खा. संजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हाप्रमुख महेश नळगे यांच्या नेतृत्वात शिवसेनेच्या शिष्टमंडळाने जालना जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत तात्काळ मदतीची मागणी केली.

या निवेदनात शेती पिकांचे पंचनामे न करता, कोणतेही निकष न लावता हेक्टरी सरसकट आर्थिक मदत जाहीर करण्याची मागणी करण्यात आली आहे.पिकांचं अतोनात नुकसान जिल्ह्यात विशेषत परतूर आणि मंठा तालुक्यांत जोरदार पावसाने हाहाकार माजवला आहे. सोयाबीन, कपाशी, तूर यांसारखी प्रमुख पिके पाण्याखाली गेली असून, शेतकऱ्यांना येणारा उतारा (पिकांचा उत्पादन घट) मोठ्या प्रमाणात झाला आहे. शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असून, सरकारकडून तातडीने मदतीची अपेक्षा आहे.यावेळी

शिष्टमंडळात प्रमुख पदाधिकारी उपस्थित या निवेदनप्रसंगी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख माधवराव कदम, अशोकराव आघाव, तसेच तालुका प्रमुख परतूर, मंठा, घनसावंगी, अंबड, जालना ग्रामीण यांच्यासह प्रदीप बोराडे, भारत पंडित, बाळासाहेब गावडे, प्रल्हादराव नाईकनवरे, गणेशराव दराडे, संदीप कंटुले, दत्ता सुरंग, मधुकर पाईकराव, दीपक काळे, राजू शिंदे, रजनीश कणके आणि शिवसेनेचे इतर सर्व आघाडीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.शासनाने तात्काळ निर्णय घ्यावा शिवसेनेच्या वतीने मागणी करण्यात आली आहे



दैनिक
समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )


# बदनापूर तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान

प्रतिनिधी @ बदनापुर



तालुक्यातील अंबडगाव, धोपटेश्वर, गेवराई बाजार व गोकुळवाडी परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. ही माहिती मिळताच बदनापूरचे तहसीलदार मा. हेमंत तायडे यांच्याशी संपर्क साधून स्थानिक पदाधिकारी व अधिकारी यांनी घटनास्थळी धाव घेतली.

अंबडगाव, धोपटेश्वर, गेवराई बाजार व गोकुळवाडी शिवारात पाहणीदरम्यान शेतकरी शुभम प्रभाकर कान्हेरे, दिनेश नारायण कान्हेरे यांच्यासह अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी व पिकांचे मोठे नुकसान झाल्याचे समोर आले. सोयाबीन, मूग, उडीद, कापूस यांसारखी हंगामी पिके पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे.या पाहणीवेळी शेतकऱ्यांच्या परिस्थितीची माहिती घेऊन प्रशासनाला तात्काळ पंचनामे करण्याचे, शेतकऱ्यांना शासकीय मदत व अनुदान देण्याचे तसेच नुकसान भरपाई त्वरीत उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले गेले.

या वेळी बदनापूर तहसीलदार हेमंत तायडे, तालुका कृषी अधिकारी गोपाल गुजर, पंचायत समिती गटविकास अधिकारी सौ. ज्योती राठोड, मंडळ अधिकारी भारडीकर, माजी जिल्हाध्यक्ष भाजप बद्रीनाथ पठाडे पाटील, बदनापूर विधानसभा प्रमुख अनिलराव कोलते पाटील, तालुकाध्यक्ष भगवान मात्रे पाटील, तलाठी चव्हाण, सरपंच सुरेश लहाने यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ व शेतकरी उपस्थित होते.

# पैठण शहरात आहेत प्राचीन बारा गणपती मंदिरे...

प्रतिनिधी @ पैठण

येत्या दि.२७ बुधवारी गणेश चतुर्थी पर्वावर सार्वजनिक गणेशोत्सव प्रारंभ होत असल्यामुळे प्राचीन तथा ऐतिहासिक आगळेवेगळे महत्त्व असलेल्या नियमित भाविक वर्ग दर्शनासाठी येत असलेल्या दक्षिण काशीतील पैठण शहरातील बारा गणेश मूर्तींची मंदिरे सुशोभित करण्यात व्यवस्थापक लागले आहेत. गणेश उत्सवात पेशवे गणपती, नागघाट, तीर्थस्तंभावरील नृत्यरत गणपती, तीर्थखांब उद्यान,गणेश गणपती गणेशघाट,सिद्धिविनायक गणपती भद्रकाली मंदिर शेजारी जर गल्ली, अखंड गणपती लाटे

निवास,बालाजी मंदिर गल्ली, विनायक गणपती गणगे निवास सुतारपार गल्ली, रत्न चिंतामणी गणपती धर्माधिकारी निवास नाथगल्ली पूर्व, शनी गणपती नाथगल्ली, दोलेश्वर गणपती दोलेश्वर महादेव मंदिर संतनगर,शमी गणपती भवानी नगर,शेंगटे गणपती ज्ञानेश्वर ऊद्यान मुख्य गेट समोरील परिसर,पावनगणपती पैठण-छत्रपती संभाजीनगर या गणपतींच्या दर्शनासाठी महाराष्ट्रातील भक्तगण आवर्जून येतात.

पैठण शहरातील स्वातंत्र्य पुर्वीची गणेश मंडळे

ब्रिटिशांची व निजामाची सत्ता उखडून काढण्यासाठी त्या काळातील तरुणांनी एकत्र येऊन पैठण शहरात सार्वजनिक गणेश मंडळांची स्थापना केली होती. आद्य गणेश मंडळ मामा चौक, स्थापना सन १९२६, कापड मंडई गणेश मंडळ कापड मंडई चौक, सन १९४१,छत्रपती शिवाजी गणेश मंडळ जैनपुरा सन १९४२,उदय भारत गणेश मंडळ लोहारगल्ली चौक,सन १९४३, महाराणा प्रताप गणेश मंडळ महाराणा प्रताप चौक,सन १९४५, महाराष्ट्र गणेश मंडळ साळीवाडा चौक,सन १९५०,

तर छत्रपती शिवाजी संघ रंगारहट्टी सन १९६०, नुतन गणेश मंडळ नेहरु चौक १९६३,जय बजरंग गणेश मंडळ कहारवाडा चौक सन १९६९ हि जुनी गणेश मंडळे आहेत.शहरातील सार्वजनिक गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी ११ दिवसीय उत्सवात यंदा सामाजिक प्रबोधनाचे विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. या उत्सवाची सांगता दि.६ डिसेंबर २०२५ शनिवारी होणार



आहे.गणपती विसर्जनासाठी पैठणच्या नाथ मंदिर मागील गोदावरी पात्रात नाथसागरचे पुरेसे पाणी स्थानिक जलसंपदा, तहसील प्रशासन व पोलीस प्रशासन यांनी ठेवण्याचे नियोजन करावे अशी मागणी गणेश भक्तांनी केली आहे.

**राष्ट्र हिताच्या बातम्यांकडे दुर्लक्ष म्हणत खा. बजरंग सोनवणेंनी वेधले सभागृहाचे लक्ष**
**राज्यमंत्री डॉ.मुरूगन यांच्याकडून टीआरपी प्रणाली मधे बदल करण्यास मान्यता**

# अखेर सर्वसामान्य जनतेच्या मनातील खदखद खा.बजरंग सोनवणे यांच्या माध्यमातून बाहेर

प्रतिनिधी @ केज

सध्या दूरदर्शन वरील वृत्त वाहिन्यांवरील बातम्यांचे मूल्यांकन 'टीआरपी' (टेलिव्हिजन रेटिंग पॉइंट्स)च्या आधारे होत असल्या मुळे उच्च-टीआरपी मिळविणाऱ्याबातम्यांना प्राधान्य दिले जाते,तर राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने महत्त्वाच्या परंतु कमी टीआरपी मिळविणाऱ्या बातम्यांकडे दुर्लक्ष होत असल्याची बाब खा. बजरंग मनोहर सोनवणे यांनी लोकसभेत उपस्थित केली.या प्रश्नाला उत्तर देताना माहिती व प्रसारण तसेच संसदीय कामकाज राज्यमंत्री डॉ.एल.मुरुगन यांनी सरकार टीआरपी मूल्यांकन प्रणालीत बदल करण्याची गरज मान्य करत असल्याचे स्पष्ट केले.

खा.बजरंग सोनवणे यांनी लोकसभेत अनेक विषयावर महत्वाची चर्चा केली असून अलिकडे अधिक टीआरपी मिळविण्या साठी किळसवाणे व्हीडीओज,विद्वेष पसरवणारे डिबेट्स, अनैतिक व सामाजिक विकृतीला खतपाणी घालणारे कार्यक्रम दाखविले जात आहेत. त्यामुळे निकोप समाज निर्मितीला गंभीर धोका निर्माण झाला आहे. राजव्यवस्था,धर्म व्यवस्था,समाजव्यवस्था,कुटुंब व्यवस्था आणि व्यक्तिमत्व विकास यावर प्रसारमाध्यमांचा स्लो पोईजनिंगसारखा परिणाम होत असतो, असा मुद्दा मांडला. यावर उत्तर देताना डॉ.मुरुगन म्हणाले, नोंदणीकृत प्रेक्षक रेटिंग एजन्सीज कडून मिळणाऱ्या डेटावर आधारित असलेली विद्यमान प्रणाली सुधारण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी मंत्रालयाने टीआरपी मोजणी संदर्भातील विद्यमान धोरण मार्गदर्शक तत्त्वांमध्ये सुधारणा करण्याचा मसुदा संकेतस्थळावर सार्वजनिक चर्चेसाठी प्रसिद्ध केला आहे.



सरकारच्या मते या सुधारणा केल्यामुळे न्याय्यस्पर्धेला प्रोत्साहन मिळेल,अधिक अचूक व प्रतिनिधिक डेटा निर्माण होईल,देशभरा तील प्रेक्षकांच्या विविध व बदलत्या माध्यम वापराच्या सवयींचे योग्य प्रतिबिंब दिसेल. त्यामुळे टीआरपी मूल्यांकनात गुणात्मक ते लाही महत्त्व दिले जाईल आणि अनैतिक स्पर्धेला आळा बसण्याची अपेक्षा आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी सामाजिक विकृतीला खतपाणी घालणारे कार्यक्रम दाखवू नयेत,अशीही मागणी केली. विकासात्मक विषया सोबतच सामाजिक स्वास्थ बिघडण्यास कारणीभूत ठरणाऱ्या विषयावर खा.सोनवणे यांनी केंद्र सरकारचे लक्ष वेधले. अधिवेशनाच्या सुरुवातीलाच खा. बजरंग सोनवणे यांनी उल्लू टीव्ही या चॅनल वरील विकृत कार्यक्रमांचे प्रसारण बंद करण्यात महत्वाची भूमिका निभावलीहोती. यानंतर राज्यमंत्री डॉ.एल.मुरुगन यांनी सरकार टीआरपी मूल्यांकन प्रणालीत बदल करण्याची गरज मान्य करत असल्याचे स्पष्ट केले.दरम्यान सर्व सामान्य नागरिकांच्या मनात असलेली ही खदखद खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत मांडल्यामुळे नागरिक समाधान व्यक्त करीत आहेत.केंद्र सरकारने तातडीने पावले उचलुन अशा वाहिन्यांना पायबंद घातला पाहिजे अशी मागणी होताना दिसत आहे.

# १५ वर्षांपेक्षा जुन्या वाहनांची नोंदणी महागली

प्रतिनिधी । बीड

नवी दिल्ली : केंद्र सरकारने जुन्या वाहनांच्या नोंदणी शुल्कात दुप्पट वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. पंधरा वर्षांपेक्षा जास्त जुन्या वाहनांचा वापर कमी करण्यासाठी केंद्र सरकारने हा निर्णय घेतला आहे. रस्ते वाहतूक मंत्रालयाकडून याबाबत अधिसूचना जारी करण्यात आली.

मंत्रालयाने जाहीर केल्या अधिसूचनेनुसार, १५ वर्षांपेक्षा जुन्या मोटरसायकलच्या नोंदणीसाठी २,००० रुपये मोजावे लागतील. तीन चाकी वाहनांना ५,००० रुपये तर, कार, जीप, व्हॅन आणि वैयक्तिक किंवा व्यावसायिक वापरातील लहान ट्रक यांना १०,००० रुपये मोजावे लागतील.

परदेशातून भारतात आणलेल्या २ किंवा ३ चाकी वाहनांना २० हजार रुपये तर ४ चाकी वाहनांना ८० हजार रुपये भरावे



लागणार आहेत. इतर मोठ्या वाहनांना १२ हजार रुपये भरावे लागणार आहेत. जुन्या वाहनांमुळे होणारे प्रदूषण आणि त्यांची देखभाल खर्चिक असल्याने, त्यांचा वापर कमी व्हावा हा यामागील मुख्य उद्देश आहे. या निर्णयामुळे वाहनधारकांवर आर्थिक भार पडणार असला तरी पर्यावरणाच्या दृष्टीने हा महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

# एकजुटीमुळेच कॉंग्रेस पक्ष मजबुत -खा.रजनीताई पाटील

प्रतिनिधी @ केज

शिमला येथील पीटरहॉफ येथे शुक्रवार रोजी मतचोरी विरोधात रॅली काढण्यात आली. हिमाचल प्रदेश कॉंग्रेस च्या प्रभारी राज्यसभा खा.रजनीताई पाटील यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.यावेळी बोलताना कॉंग्रेस पक्ष हा कार्यकर्त्यांच्या एकजुटीमुळेच आजही सक्षम व मजबूत आहे. कार्यकर्त्यांच्या सक्रियते मुळेच संघटनाला नव संजीवनी मिळते,असे प्रतिपादन कॉंग्रेसच्या हिमाचल प्रदेश प्रभारी व राज्यसभा खा. रजनीताई पाटील यांनी केले.यावेळी हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुक्खू, प्रदेश कॉंग्रेस अध्यक्षा प्रतिभा सिंह,हिमाचल प्रदेश



कॉंग्रेस प्रभारी खा.रजनीताई पाटील आदी उपस्थित होते.

यानंतर,खा.रजनीताई अशोकराव पाटील व मंत्रीमंडळातील सहकाऱ्यांसोबत कॉंग्रेस आमदार दलाच्या बैठकीत सहभाग घेतला.याबैठकीत येत्या काळात पक्षाच्या वतीने आयोजित होणाऱ्या कार्यक्रमांवर सविस्तर चर्चा झाली तसेच संघटन अधिक मजबूत करण्यासाठी ठोस रणनीती आखण्यात आली.आम्ही पूर्ण समर्पण आणि एकजुटी ने कॉंग्रेस पक्षाची मजबुती,तसेच राज्याची सेवा आणि विकासासाठी सातत्याने कार्य करत राहू मत व्यक्त केले.

# केज येथे एम सी ई डी व अमृतच्या माध्यमातून खुल्या प्रवर्गासाठी उद्योजक मेळावा संपन्न

प्रतिनिधी @ केज

केज येथे पंचायत समिती सभागृहात महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र(एम सी ई डी )जिल्हा उद्योग केंद्र बीड महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत ) पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने खुल्या प्रवर्गातील गरजू ना व्यावसायिक प्रशिक्षण व व्यावसायिक मार्गदर्शन साठी उद्योजक मेळावा आयोजित केला होता. यावेळी एम सी ई डी चे जिल्हा समन्वयक श्री. दत्तात्रय क्षीरसागर, अमृत चे दिगंबर जोशी, वैद्यनाथ बँकेचेसंचालक प्रवीण देशपांडे, समस्त ब्राह्मण संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष धनंजय कुलकर्णी उपस्थित होते यावेळी खुल्या वर्गातील अनेक जण उपस्थित होते.खुल्या प्रवर्गातील महाराष्ट्रात व्यवसाय करू इच्छिणाऱ्या गरजू ना अमृत संस्था यांच्या कडून व्याज परतावा मिळतो




यासाठी आवश्यक त्या कागद पत्राची पूर्तता करणे आवश्यक आहे.यापूर्वी खुल्या प्रवर्गासाठी शासनाकडून कसलीही मदत मिळत नव्हती परंतु अमृत ची स्थापना झाल्यामुळे ब्राह्मण, मारवाडी,कोमटी सह खुल्या प्रवर्गातील ८ लक्ष रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्यांना या योजनेचा लाभमिळणार आहे.तसेच यासाठी लागणारे प्रशिक्षण हे महाराष्ट्र उद्योजकता विकास प्रशिक्षण संस्था यांच्याकडून मोफत मिळणार आहे असेही प्रकल्प अधिकारी श्री. दत्तात्रय क्षीरसागर यांनी सांगितले तसेचवैद्यनाथ बँकेचे संचालक प्रवीण देशपांडे यांनी बँकेचे अटीशर्थीनुसार बँकेच्या सर्व शाखा मधून कर्ज मिळेल असे सांगितले. यावेळी अमृतचे दिगंबर जोशी,पंचायत समितीचे अधिकारी अजय ढोकर धनंजय कुलकर्णी,

# माजलगावात पारंपारिक पध्दतीने बैलपोळ्याची मिरवणूक उत्साहात

**प्रतिवर्षाप्रमाणे शेटे कुटुंबियांना मिळाला पहिला मान**

प्रतिनिधी @ माजलगांव

शहर आणि परिसरात पारंपारिक बैलपोळा उत्साहात साजरा करण्यात आला. प्रतिवर्षाप्रमाणे शेटे कुटुंबियांना मिरवणुकीचा पहिला मान मिळाला. पिठोरी अमावस्येच्या दिवशी शुक्रवारी बैलांचा सण पोळा उत्साहात साजरा करण्यात आला. माजलगाव शहरात मानाच्या शेटे कुटुंबीयांच्या बैलांची प्रथम मिरवणुकीनंतर शहरात पोळ्यास प्रारंभ झाला. माजलगाव शहरात शुक्रवारी दुपारी १ वाजेच्या सुमारास झेंडा चौक भागातील मानाचे शेतकरी विश्वनाथ विठ्ठलअप्पा शेटे यांच्या बैलांची प्रथम मिरवणूक काढली. शेटे यांच्या बैलांची विधिवत पूजा करण्यात आली. बैलांना पुरणपोळीचा नैवेद्य दिल्यानंतर त्यांची ढोल-ताशांच्या गजरात वाजतगाजत मिरवणूक



काढण्यात आली. झेंडा चौकातून मस्जिद चौक, हनुमान चौक मार्गे ही मिरवणूक निघाली. चौकातील हनुमान मंदिरात दर्शन घेऊन मिरवणुकीच्या सांगता झाली. याप्रसंगी सोमनाथ शेटे, पंचाक्षरी शेटे यांच्यासह कुटुंबीयांची उपस्थिती होती. त्यानंतर शहरातील शेतकऱ्यांच्या बैलजोड्या, गायी, कारवड या सर्वांच्या मिरवणुका वाजतगाजत काढण्यात आल्या. रात्री उशिरापर्यंत बैलपोळ्याच्या मिरवणुका शांततेत सुरूच होत्या.

सण उत्सवातून कृषीसंस्कृतीचे जतन : विश्वनाथ शेटे

महाराष्ट्र कृषिप्रधान राज्य म्हणून ओळखले जाते. कृषी संस्कृती सण उत्सवाच्या माध्यमातून जपली जाते. पोळा हा त्यातीलच महत्त्वाचा सण होय. माजलगावातील पोळ्याच्या मिरवणुकीचा मान पूर्वीपासूनच आमच्या कुटुंबियांकडे आहे, याचा सार्थ अभिमान वाटतो.

**पंधराव्या वित्त आयोग निधीला ग्रामसभेची मंजुरी**

# मंजूर निधीच्या कामांना तात्काळ गती देण्याचा ग्रामस्थांचा एकमुखी निर्णय पण उपसरपंचांचा बहिष्कार

प्रतिनिधी @ पाली

पाली ग्रामपंचायती अंतर्गत पंधराव्या वित्त आयोगाचा २०२१-२२ पासून अखर्च असलेला निधी अखेर आज (२२ ऑगस्ट) झालेल्या ग्रामसभेत खर्चासाठी मंजूर करण्यात आला. यावेळी गावकरी मोठ्या संख्येने हजर राहून आराखड्यानुसार कामांना मंजुरी दिली. मंजूर निधीच्या कामांना तात्काळ गती देण्याचा निर्णय ग्रामसभेत घेण्यात आला.पण उपसरपंचांनी गोंधळ घालून बहिष्कार केला.

ग्रामसभा ऐतिहासिक ठरावी इतक्या मोठ्या प्रमाणावर गाव एकवटले होते. मात्र, गावाचे उपसरपंच महेंद्र वीर आणि सदस्य साळुंके अनिल यांनी ग्रामसभेला बहिष्कार टाकत विरोधाचा सूर लावला. त्यांच्या या भूमिकेमुळे ग्रामस्थांमध्ये



नाराजीची भावना व्यक्त होताना दिसली.

ग्रामविकास अधिकारी शंकर वाघमारे यांच्या उपस्थितीत झालेल्या सभेत महिला सरपंच मंजुषा नवले यांनी विकासकामे तात्काळ पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. ग्रामस्थांनी देखील विकासकामांना एकमुखी पाठिंबा दर्शवत अखर्च निधी रोखून धरल्याबद्दल अप्रत्यक्ष संतापही व्यक्त केला.ग्रामसभेतील एकमुखी निर्णयानुसार, निधीतील कामे ठरलेल्या आराखड्याप्रमाणे पूर्ण होणार असून गावाच्या विकासात अडथळा आणणाऱ्यांना ग्रामस्थांनी धडा शिकवावा, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# राज्य पुरस्कार प्राप्त आदर्श मुख्याध्यापक श्री.जगन्नाथ राघोबा सोनवणे सर

भावी पिढीत सुसंस्काराचे मूल्य रुजवीत दीर्घ काळापासून ज्यांनी शिक्षण सेवेचे व्रत स्वीकारले असे ज्ञानवंत, सेवा व्रती जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मांडवा येथील आदर्श मुख्याध्यापक तथा महाराष्ट्र शासनाचा राज्य पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक श्री. जगन्नाथ राघोबा सोनवणे सर हे ३१ ऑगस्ट २०२५ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. आपल्या सत्कार्याच्या माध्यमातून ज्यांनी सभोवतालच्या जीवनात सातत्याने आनंदाची, उत्साहाची पेरणी केली आणि येणाऱ्या पिढीला दिशा दिली. त्यांनी इतरांच्या दुःखात मदतीचा हात दिला तर कधी पाठीवर सहानुभूतीची थाप दिली. गेली ३६ वर्षे ११ महिने व २६ दिवस शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात कार्यरत असताना ज्ञानप्रसारक, कृतीदर्शक, विज्ञानवादी, मार्गदर्शक, मित्र, बंधू म्हणून प्रत्येक भूमिकेत सोनवणे सरांचे योगदान अतुलनीय आहे.

श्री. जगन्नाथ सुभद्राबाई राघोबा सोनवणे यांचा जन्म दिनांक १२ ऑगस्ट १९६७ साली बावी, ता. आष्टी, जि. बीड येथे झाला. त्यांनी एम. ए., बी. एड्. पर्यंत आपले शिक्षण पूर्ण केलेले आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतचे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बावी, ता. आष्टी, जि. बीड येथे झाले असून पुढील इयत्ता पाचवी ते दहावी पर्यंतचे शिक्षण पद्मावती विद्यालय डोईठाण, ता. आष्टी, जि. बीड येथे झालेले आहे. तसेच त्यांचे डी. एड्. शासकीय अध्यापक विद्यालय नेकनूर येथे झाले आहे. तद्नंतर पुढे बी. एड्. त्यांनी शासकीय अध्यापक महाविद्यालय अंबाजोगाई येथे पूर्ण केलेले आहे. त्यांची पत्नी सौ. छबुबाई जगन्नाथ सोनवणे - दहिफळे या जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा आष्टी नंबर १ येथे शिक्षिका आहेत. त्यांचे पण शैक्षणिक काम आदर्श असून सोनवणे सरांना एक मुलगा व एक मुलगी आहे. मुलगा श्री. महेश जगन्नाथ सोनवणे यांचे शिक्षण मास्टर ऑफ सिव्हिल इंजिनियर झालेले आहे. तर मुलगी सौ. राजश्री संजय गर्जे ही पण उच्च शिक्षित असून तिचे शिक्षण एस. एस. सी., डी. एड्., एम. ए., एम. एड्. झालेले असून ति सध्या भगवान महाविद्याल, आष्टी, जि. बीड येथे प्राध्यापक म्हणून आदर्श काम करत आहे. तसेच त्यांचे जावाई श्री. संजय योगीराज गर्जे यांचे शिक्षण एम. फॉर्म. झालेले असून ते पण उच्च शिक्षित आहेत. ते सध्या उपप्राचार्य म्हणून बी. फार्मसी. कॉलेज कडा, ता. आष्टी, जि. बीड येथे आदर्श शैक्षणिक कामकाज करत आहेत.



श्री. जगन्नाथ सोनवणे सरांची प्रथम नेमणूक दिनांक ५ सप्टेंबर १९८८ असून दि. ५ सप्टेंबर १९८८ ते दि. ३० एप्रिल १९८९ अशी ९ महिने त्यांनी आपल्या जन्मगावी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बावी, ता. आष्टी, जि. बीड येथे सेवा केलेली आहे. तद्नंतर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वेलतुरी, ता. आष्टी, जि. बीड येथे दि. २६ जून १९८९ ते दि. २५ जून १९९३ अशी ४ वर्षे शैक्षणिक सेवा केलेली असून पुढे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सांगवी पाटण, ता. आष्टी, जि. बीड येथे दि. २६ जून १९९३ ते दि. ११ जून २००६ या कार्यकाळात १३ वर्ष सेवा केलेली आहे. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा बेलगाव, ता. आष्टी, जि. बीड येथे दि. १२ जून २००६ ते दि. ३० मे २०१६ अशी १० वर्ष सेवा केलेली असून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बीडसांगवी, ता. आष्टी, जि. बीड येथे दि. ३१ मे २०१६ ते दि. ३१ मे २०१८ अशी २ वर्ष सेवा बजावली आहे. पुढे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मांडवा, ता. आष्टी, जि. बीड येथे दि. ३१ मे २०१८ ते दि. ३१ ऑगस्ट २०२५ अशी ७ वर्ष व ३ महिने मुख्याध्यापक म्हणून प्रशासकीय व शैक्षणिक आदर्श सेवा केली. त्यांची एकूण सेवा ३६ वर्ष ११ महिने व २६ दिवस झालेली आहे.

आपल्या आदर्श शैक्षणिक सेवेबद्दल श्री. जगन्नाथ सोनवणे सरांना स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या. कडा, ता. आष्टी, जि. बीड चा आदर्श शिक्षक पुरस्कार दि. ५ सप्टेंबर २००२ रोजी मिळाला असून राज्यस्तरीय अनिस कार्य गौरव शिक्षक पुरस्कार सन - २००७, जिल्हा परिषद बीड चा आदर्श शिक्षक पुरस्कार सन - २००९, तसेच अतिउत्कृष्ट शैक्षणिक कार्याबद्दल त्यांना महाराष्ट्र शासनाने राज्य शिक्षक पुरस्काने दि. ५ सप्टेंबर २०१३ रोजी सन्मानित केलेले आहे. तसेच त्यांनी तालुकास्तर, जिल्हास्तर, राज्यस्तर व देश पातळीवरील सीसीआरटी प्रशिक्षण घेतलेले आहे. तसेच शैक्षणिक साहित्य निर्मिती करुन प्राथमिक शिक्षक निर्मित शैक्षणिक साहित्य प्रदर्शनामध्ये सन - २००६ ते सन - २०१३ पर्यंत सलग सहा वेळा बीड जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळवून यवतमाळ, सोलापूर, चंद्रपूर, नंदुरबार, बारामती व नागपूर येथील राज्यस्तरीय विज्ञान व शैक्षणिक साहित्य प्रदर्शनामध्ये सहभाग नोंदविलेला आहे. विज्ञान प्रदर्शन - सन २००१, सन २०११, सन २०१४ साली अशी तीन वेळा त्यांच्या उपकरणांची वर्धा, छत्रपती संभाजीनगर व नागपूर येथील राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली. या सर्व शैक्षणिक गोष्टींचे फळ म्हणून त्यांना दि. ५ सप्टेंबर २०१३ साली महाराष्ट्र शासनाचा राज्य पुरस्कार मिळाला. अशा या सर्वगुणसंपन्न आदर्श मुख्याध्यापकांना सेवापुर्तीच्या निमित्ताने शिक्षक वृंद व दै. समर्थ राजयोग परिवाराच्या वतिने भावी वाटचालीस व निरोगी आयुष्यासाठी मनस्वी हार्दिक शुभेच्छा...!!!

**-राजेंद्र लाड, आष्टी**
९४२३१७०८८५

## गट, गणांची मोडतोड; कही खुशी कही गम; जिल्हा परिषद पंचायत समित्यांच्या गट-गणांची अंतिम प्रभाग रचना जाहीर

अहिल्यानगर । प्रशांत बाफना जिल्हा प्रतिनिधी

आगामी जिल्हा परिषद प पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या गट-गणांच्या प्रारूप रचनेवरील हरकतींवर सुनावणी होऊन अंतिम गट-गण रचना विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मान्यतेने जाहीर करण्यात आली आहे. अंतिम गट-गण रचना जाहीर झाल्याने जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणूक प्रक्रियेला वेग येणार आहे. दरम्यान, अनेकांनी घेतलेल्या हरकतीमध्ये काहींच्या तक्रारी ग्राह्य धरत बदल करण्यात आला आहे. त्यामुळे गट-गणांची मोडतोड करण्यात आल्याने अहिल्यानगर जिल्ह्यात कही खुशी कही गम अशीच स्थिती पहावयास मिळत आहे.

जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या आगामी निवडणुकीसाठी जाहीर करण्यात आलेल्या प्रारूप प्रभाग रचनेवर दाखल झालेल्या ९२ हरकतींवर सुनावणी झाली. यातील जामखेड, पारनेर, कोपरगाव, श्रीगोंद्यातील २३ हरकती मान्य करण्यात आल्या होत्या. ६९ हरकती फेटाळण्यात आल्या. १४ जुलैला जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गण याचा प्रारूप प्रभाग रचनेचा आराखडा जाहीर केला होता. त्यावर २१ जुलैपर्यंत हरकती व सूचना देण्याची अंतिम मुदत होती. प्रारूप प्रभाग रचना जाहीर करताना जिल्हा परिषदेचे ७५ व पंचायत समितीचे १५० गणांमध्ये समाविष्ट असलेल्या गावांची नावे व नकाशा जाहीर करण्यात आले होते. ही रचना २०११ च्या लोकसंख्येच्या आधारावर असून झिकझॅक पद्धतीने हा आराखडा तयार करण्यात आलेला आहे.

अकोल्याच्या समशेरपूरपासून ते जामखेडच्या खर्डापर्यंत असा हा प्रारूप प्रभाग रचनेचा आराखडा जाहीर झाल्यानंतर हरकती व सूचनांचा पाऊस पडेल असे वाटले होते. प्रत्यक्षात दिलेल्या मुदती ९२ तक्रारी आल्या होत्या. दाखल झालेल्या हरकतींपैकी जामखेड, पारनेर, कोपरगाव व श्रीगोंदा तालुक्यातील २३ हरकती मान्य झाल्या असून उर्वरित ६९ हरकती फेटाळण्यात आल्या होत्या. विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मान्यतेने अंतिम गट गण रचना जाहीर करण्यात आली आहे.

आरक्षणाकडे इच्छुकांच्या नजरा

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी अनेक इच्छुकांनी तयारी सुरु केली आहे. परंतु, आपले गाव कोणत्या गटात आहे. याकडे लक्ष लागले होते. आता जिल्हाधिकाऱ्यांनी गट आणि गणांची अंतिम रचना जाहीर केली आहे. त्यामुळे जाहीर झालेल्या गटात व गणात कोणते आरक्षण पडते याकडे इच्छुकांच्या नजरा लागल्या आहेत. गट गण जाहीर झालेल्याने लवकरच आरक्षणही जाहीर होईल असे प्रशासनाकडून सांगितले जात आहे.

# लोकांच्या डोक्यात विष पेरणाऱ्या षड्यंत्र करणाऱ्या गावगुंडांचा बंदोबस्त करा :- थोरात

संगमनेर अहिल्यानगर/प्रशांत बाफना जिल्हा प्रतिनिधी

संगमनेर तालुक्याच्या विकास आणि शांततेचे राजकारण मोडण्यासाठी येथील लोकप्रतिनिधी हा हत्यार म्हणून काम करत असून अशांतता निर्माण करणाऱ्या तसेच लोकांच्या डोक्यात विष पेरले जात आहे, षड्यंत्र आखले जात आहे. तालुक्यात विकासा ऐवजी संगमनेरात गाढवाचा नांगर फिरवत असल्यानेअशा गावगुंडांचा वेळीच बंदोबस्त करण्याचे आवाहन काँग्रेसचे वरिष्ठ नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी जनसमुदायाला केले आहे.

आम्हाला नथुराम गोडसे व्हायला भाग पाडू नका असे म्हणत माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांना मारण्याची धमकी देणाऱ्या तथाकथित संग्राम भंडारे याने दिलेल्या धमकीचे आणि सज्जड इशा-याचे तीव्र पडसाद संगमनेर शहरासह तालुक्यात आणि संपूर्ण महाराष्ट्रात उमटल्यानेतालुक्याची अस्मिता जपण्यासाठी हजारोच्या संख्येने संगमनेर नवीन नगर रोड येथे हजारोच्या संख्येने जनसागर एकवटला.

तत्पूर्वी यशोधन जनसंपर्क कार्यालया पासूनस्वाभिमानी संगमनेर तालुका ,सकल हिंदू समाज व विविध पुरोगामी संघटना आणि महाविकास आघाडी आणि विविध आध्यात्मिक व वारकरी संघटना आणि राजकीय पक्षांच्या वतीने लोकनेते बाळासाहेब थोरात यांना मारण्याची धमकी दिल्याच्या निषेधार्थ भव्य दिव्य असा शांती मोर्चा काढला.

यावेळी माजी आमदार डॉ सुधीर तांबे, माजी नगराध्यक्षा दुर्गा तांबे,उद्योजक रामहरी कातोरे, माजी शहराध्यक्ष विश्वास मुर्तडक, शहराध्यक्ष सोमेश्वर दिवटे, निखील पापडेजा, प्रा हिरालाल पगडाल , शिवसेनेचे माजी शहर प्रमुख अमर कतारी, शहर प्रमुख रवींद्र कानकाटे, भारतीय रिपब्लिकन पक्षाचे कैलास कासार, तालुकाध्यक्ष अजय फटांगरे सह अनेक पदाधिकारी कार्यकर्ते तसेच



तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

थोरात म्हणाले की, थोर स्वातंत्र्य सैनिक भाऊसाहेब थोरात यांचा मुलगा आहे. मला संघर्ष नवीन नाही . विचारांसाठी आणि तत्त्वासाठी बलिदान देण्याची आपली तयारी आहे. हिंदू धर्म आणि वारकरी संप्रदायाचे आम्ही पाईक आहोत. गगनगिरी महाराजांच्या सप्ताहात वाढण्याचे काम आपण केले खांडेश्वर, रामेश्वर, अकलापूर, बाळेश्वर, निझर्णेश्वर आदि मंदिरांचे विकासकामे बांधकाम व सुशोभीकरण आपणच केले आहे. वारकरी संप्रदायाचे व्यासपीठ हे कोणत्याही पक्षाचे अथवा जातीचे होऊच शकत नाही. संत, महंत आणि वारकरी संप्रदायाने समाजाला मानवतेचा विचार दिला आणि तोच विचार घेऊन आपण पुढे चाललो आहे. संगमनेर सारखा सुकून अन्यत्र कुठेही पाहायला मिळत नाही असे बाहेरचे लोक आवर्जून सांगतात.

ईव्हीएम चा घोटाळा तुमच्यासाठीचहोता असे आता सर्वच म्हणताना दिसून येत आहेत. तालुक्याचा विकास मोडला जात आहे. विरोधक आता सहकार मोडण्यास निघाले. कारण आता या ठिकाणी गाढवाचा नांगर फिरवण्याचे काम सुरू झाले आहे. त्यामुळे जनता आता शांत बसणार नसल्याचे सांगत थोरात यांनी एकप्रकारे विरोधकावर तोफच डागली.

# मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा: डीवायएफआयचा आंदोलनाचा इशारा

**प्रतिनिधी** @ अंबाजोगाई

अंबाजोगाई शहरात व परिसरात मोकाट कुत्र्यांची होत असलेली वाढ ही शहरातल्या नागरिकांसाठी खूप मोठी समस्या झाली. याबाबत डीवायएफआय संघटनेच्या वतीने मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी प्रसिद्ध दिलेल्या पत्रकाद्वारे करण्यात आली आहे. नागरिकांनी नगर पालिकेला अनेकवेळा कळवण्यात आलेले आहे. परंतु पालिकेने यावर कोणतही कार्यवाही केलेली नाही. या कडे पालिकेने लक्ष घालून ही समस्या सोडवावी अन्यथा संघटेच्या वतीने आंदोलन करण्यात येईल.



शहरातील विविध भागात मोकाट भटकणार्या व नागरिकांवर जीवघेणा हल्ला करणार्या कुत्र्यामुळे अंबाजोगाई मध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. सकाळी शाळेत जाणारे मुले, मॉर्निंग वॉक करणारे नागरिक, रात्री उशिरा कामावरून घरी परतणारे कर्मचारी कामगारांवर ही मोकाट कुत्रे हल्ले करत असल्याने शहरात प्रवास करणे आता धोक्याचे झाले आहे. अंबाजोगाई नगरपरिषद हद्दीमध्ये नगर परिषद प्रशासनाने पाहिजे तसे लक्ष न दिल्याने मोकाट कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. याकडे नगर परिषदेने लक्ष द्यावे व निर्बिजीकरण व भटक्या कुत्र्याच्या बंदोबस्त करावा, अशी मागणी डीवायएफआय संघटनेच्या वतीने प्रसिद्धी पत्राद्वारे केली आहे. अन्यथा घटनेच्या वतीने आंदोलन करण्यात येईल असा इशाराही देण्यात आला आहे.

निर्बिजीकरण व भटक्या कुत्र्याच्या बंदोबस्त बाबत पालिकेने काय केले?

निर्बिजीकरण व भटक्या कुत्र्याच्या बंदोबस्त करण्यासाठी नगर पालिकेने आतापर्यंत काय उपाय योजना केली. यासाठी किती पैसे खर्च केले?किंवा निर्बिजीकरण व भटक्या कुत्र्याच्या बंदोबस्त करण्यासाठी पैसे नाहीत. ज्यामुळे मोकाट कुत्र्यांचा आकडा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. याचे उत्तर पालिका प्रशासनाने द्यावे.

अंबाजोगाई शहरातील भटक्या कुत्र्यांवर नगर परिषदेने योग्य ती कारवाई करावी.जेणेकरून मोकाट कुत्रे नागरिकांना त्रास देणार नाहीत. एखाद्या व्यक्तीला कुत्रा चावला व त्या व्यक्तीचा मृत्यू झाला तर त्याला जबाबदार कोण? कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्यात यावे. जेणेकरून कुत्र्यांची संख्या वाढणार नाही. अंबाजोगाई नगर परिषदेने या समस्याकडे गांभीर्याने लक्ष देऊन योग्य ती कारवाई करावी.

सुहास चंदनशिव
डीवायएफ आय
जिल्हाउपाध्यक्ष

# आष्टी तालुका फोटोग्राफर संघटनेच्या अध्यक्षपदी सचिन रानडे यांची फेरनिवड

## उपाध्यक्ष सागर ढोले,सचिव अशोक राऊत,कोषाध्यक्ष संतोष सायकड तर खजिनदारपदी राजू करांडे यांची निवड

**प्रतिनिधी** @ आष्टी

आष्टी तालुका फोटोग्राफर असोसिएशनची वार्षिक पदाधिकारी निवड बैठक नुकतीच संपन्न झाली. यावर आधुनिक फोटोग्राफी तसेच विविध विषयांवर साधक बाधक चर्चा झाल्यानंतर फोटोग्राफर संघटनेची २०२५ - २६ या आगामी वर्षाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यामध्ये आष्टी तालुक्यातील प्रसिद्ध फोटोग्राफर सचिन रानडे यांची संघटनेच्या अध्यक्षपदी फेर निवड करण्यात आली तर कड्यातील सागर ढोले यांची उपाध्यक्ष म्हणून अशोक राऊत हे सचिव संतोष सायकड यांची कोषाध्यक्ष तर खजिनदार म्हणून राजू करांडे यांची निवड करण्यात आली.



आष्टी तालुका फोटोग्राफर असोसिएशनच्या वतीने दरवर्षी पदाधिकारी निवड करण्यात येते. शिवाय गतवर्षी घेण्यात आलेल्या विविध कार्यशाळा मार्गदर्शक शिबिरे तसेच आगामी वर्षात आधुनिक काळातील फोटोग्राफी तसेच नवनवीन संकल्पना यावर विचार विनिमय करून पदाधिकारी निवड बैठक संपन्न होते. त्याचाच एक भाग म्हणून जागतिक फोटोग्राफी दिनानिमित्त या निवडी जाहीर केल्या जातात. ज्यामध्ये आष्टी तालुक्यातील प्रसिद्ध फोटोग्राफर सचिन रानडे यांची संघटनेच्या अध्यक्षपदी फेर निवड करण्यात आली तर कड्यातील सागर ढोले यांची उपाध्यक्ष म्हणून अशोक राऊत हे सचिव संतोष सायकड यांची कोषाध्यक्ष तर खजिनदार म्हणून राजू करांडे यांची निवड करण्यात आली. त्यांच्या या निवडीचे तालुक्यातील सर्व फोटोग्राफर्स बांधवांनी अभिनंदन करत आगामी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# बाल कीर्तनकार वेदिकाताईचे मालकिन्ही (मंठा) येथे सुश्राव्य कीर्तन

हजारो श्रोत्यांची वाह वाही

मंठा प्रतिनिधी : तालुक्यातील मालकिन्ही येथे केवळ ७ वर्षाच्या वेदिका जाधवचे हजारो श्रोत्यांच्या उपस्थितीत कीर्तन संपन्न झाले आवडे देवासी ऐका तो प्रकार नामाचा उच्चार रात्रंदिन या आशयाचे अभंग एकूण चार चरण त्यांनी कीर्तनासाठी निवडले होते त्यांनी सांगितले की देव भक्तीचा भुकेला आहे ईश्वराचे नामस्मरण उठता बसता करीत राहावे तरीही ईश्वर त्याचे वर कृपा करतो वेदिकाताई म्हणाल्या प्रत्येकाच्या गळ्यात सोन्याची नव्हे तर तुळशीची माळ असली पाहिजे तसेच कपाळावर उभा गंध लावावा जेणेकरून मन बुद्धी प्रसन्न व चांगली होते वारकरी समाजात पंढरीला जाणे खूप महत्त्वाचे व मनःशांती देणारे आहे तेव्हा ज्याला ज्याला शक्य असेल त्याने पंढरपूरला अवश्य जावे केवळ सात वर्षाच्या वेदिका ताईने हे सर्व मुखोद्गत सांगावे हे खरोखर कौतुकास्पद आहे जवळपास दीड ते दोन तास चाललेल्या कीर्तनात



अधून मधून ताईने काही प्रबोधनात्मक दृष्टांत दिले तर अधून मधून एखादे गमतीशीर उदाहरण देऊन उपस्थितांची वाहवाई मिळवली हश्या पिकवला उल्लेखनीय म्हणजे ताईच्या कीर्तनाला दूर दूरच्या स्त्री-पुरुषांची गर्दी होते आणि श्रोते कीर्तनात तल्लीन होतात दुसरे असे की तालुक्यातच नव्हे तर जिल्ह्यातील अनेक ठिकाणी त्यांना कीर्तनाची मागणी असते बाल वयात जर इतके उत्कृष्ट कीर्तन करणारी वेदिका ताई मोठेपणी श्रेष्ठ कीर्तनकार होईल तीळ मात्र संदेह नाही

# केज शहरात बैलपोळा सण उत्साहात साजरा, डॉ.त्रिंबक चाटे यांच्या बैलपोळ्याचे केजकरांना विशेष आकर्षण

**प्रतिनिधी** @ केज

श्रावणी अमावस्येला बैलपोळा हा सण उत्साहात साजरा केला जातो.पशुधनाप्रती असलेला आदर व्यक्त करण्यासाठी हा दिवस महत्वाचा मानला जातो. वर्षभर शेतीत राबणाऱ्या पशुधना प्रती आभार व्यक्त करताना पोळ्याच्या आदल्या दिवशी हाळद आणि साजुक तुप लाऊन बैलांची मान चोळली जाते.या दिवसाला खांदे मळणी असे संबोधले जाते.श्रावणी अमावस्येला पोळा सण साजरा केला जातो.या दिवशी सकाळी पशुधनाला गुळवणी आणि सांजा यांचा फराळ दिला जातो.त्या नंतर पशुधनाच्या शिंगांना विविध रंग लाऊन विविध आभुषण घालुन सजवीले जाते. दुपारी वाजत गाजत मिरवणूक काढली जाते केज शहरातील बैल पोळ्याचे आकर्षण म्हणजे भारतीय नमो संघाचे बीड जिल्हाध्यक्ष तथा प्रतिभा नर्सिंग होम चे प्रमुख स्त्रिरोग तज्ञ

डॉ.त्रिंबकराव चाटे यांचा बैलपोळा आहे. आपल्या व्यस्त कार्याला बाजुला सारुन संपुर्ण दिवस पशुधना सोबत व्यतीतकरतात.बैलाच्या मिरवणूकीमध्ये सक्रिय सहभाग घेऊन पोळा सणानिमीत्त शेता पासुन ते निवासस्थानापर्यंत



मिरवणूक काढण्यात येते.त्यानंतर बैलांचे लग्न लावुन पुरणपोळी

बैलांना खाऊ घातली जाते.मिरवणुकीत सहभागी झालेल्या सर्व जणांना पुरणपोळीचे जेवण दिले जाते. आगामी काळात पशुधनाची संख्या कमी होत आहे.त्यामुळे नवीनपिढीला बैलपोळा सण का व कसा साजरा केला जातो याविषयी माहिती व्हावी हा या सण साजरा करण्या मागचा उद्देश आहे असे डॉ.त्रिंबकराव चाटे यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.





# अंबाजोगाई येथे पर्यावरण पुरक गणेश मुर्ती निर्मिती कार्यशाळा संपन्न

**प्रतिनिधी** @ अंबाजोगाई

योगेश्वरी शिक्षण संस्था अंतर्गत निसर्ग संवर्धन मंडळाच्यावतीने श्रीमती गोदावरीबाई कुंकूलोळ योगेश्वरी कन्या विद्यालयात पर्यावरण पुरक गणेश मुर्ती निर्मिती कार्यशाळा संपन्न झाली.यावेळी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी भेट दिली.कलाशिक्षक बनसोडे यांनी निसर्गाचा ऱ्हास कसा होतचालला आहे आणि तो आपण कसा टाळला पाहिजे याबद्दल सविस्तर माहिती सांगितली या कार्यशाळेस विद्यार्थिनी, शालेय पदाधिकारी, शिक्षिका आदी कर्मचारी उपस्थित होते.

# ओबीसीत २९ नव्या जातींचा समावेश करण्याच्या हालचाली

## राज्य मागासवर्ग आयोगाकडून शिफारशींचा प्रस्ताव, केंद्र सरकार घेणार अंतिम निर्णय

प्रतिनिधी । मुंबई

राज्याच्या इतर मागासवर्ग (ओबीसी) जातींच्या यादीत आता २९ नव्या जातींचा समावेश करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. यासंदर्भात राज्य मागासवर्ग आयोगाने राज्य सरकारला शिफारशींचा प्रस्ताव पाठवला आहे. राज्य सरकारची मंजुरी मिळाल्यानंतर हा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी केंद्र सरकारकडे पाठवण्यात येणार आहे.

महाराष्ट्रात इतर मागासवर्गीयांची यादी खूप मोठी आहे. यामध्ये सुमारे ३५१ मूळ जाती आणि त्यांच्या असंख्य उपजातींचा समावेश आहे. याशिवाय, विमुक्त जाती, भटक्या जाती, जमाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग अशा विविध जाती समूहांचाही यात समावेश होतो. या सर्व जातींच्या उपजातींना राज्याच्या यादीत स्थान देण्यात आले असून, त्यांना निश्चित आरक्षणही मिळते.

राज्यात सध्या ओबीसी वर्गात माळी, कुणबी, धनगर, वंजारी, तेली, तसेच विमुक्त जाती आणि भटक्या जमाती यांचा समावेश होतो. इतर मागासवर्ग समाजातील अनेक गट त्यांच्या जातीचा ओबीसी यादीत समावेश करण्यासाठी प्रस्ताव देतात. या प्रस्तावांनुसार,




वडवणी येथील सरकारी वकील आत्महत्या प्रकरणी

# न्यायाधीश सह एका जणा विरुध्द गुन्हा दाखल

वडवणी (प्रतिनिधी)

वडवणी कोर्टाचे न्यायाधीश रफिक शेख व लिपिक तारडे यांनी माझ्या वडीलांना सतत अपमानित करुन मानसिक त्रास देऊन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले त्यामुळे त्यांच्या त्रासाला कंटाळून वडीलांनी दि. २० ऑगस्ट बुधवार रोजी कोर्ट वडवणी येथील सरकारी वकील कक्षा मधील खिडकीचे गजास शालीच्या पट्टीने गळफास घेवून आत्महत्या केली आहे.अशा आशयाची विश्वजीत विनायक चंदेल यांनी फिर्याद दिल्यावरून न्यायाधीश व क्लार्क यांच्या विरूध गुन्हा दाखल झाला आहे.




वडवणी येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयात सहाय्यक सरकारी वकील म्हणून जानेवारी २०२५ पासून कार्यरत असणारे विनायक लिंबाजी चंदेल यांनी दिनांक २० ऑगस्ट बुधवार रोजी सकाळी दहा ते साडेदहा वाजण्याच्या सुमारास सहाय्यक सरकारी अभियोक्ता कार्यालयात खिडकीच्या लोखंडी गाजाला शालिनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडलेली होती . यामध्ये त्यांनी मृत्यूपूर्व चिठ्ठी लिहून ठेवलेली होती . यामध्ये त्यांनी वडवणी न्यायालयाचे न्यायाधीश शेख रफिक हे माझा कोर्टामध्ये सर्वासमोर अपमान करत असतात व माझे म्हणणे न ऐकता किंवा माझा विनंती अर्ज न स्वीकारतात मनमानी आदेश करतात तसेच लिपिक अण्णासाहेब तारडे हे सर्व केस मध्ये सर्व साक्षीदारांना समस काढतात माझे म्हणणे किंवा अर्ज न घेता व मला सहकार्य करत नाहीत या दोघांच्या त्रासाला कंटाळून मला आत्महत्या करणे शिवाय आता पर्याय उरलेला नाही याची चौकशी करून न्याय द्यावा ही विनंती असे पत्र माननीय मुख्य न्यायाधीश साहेब उच्च न्यायालय मुंबई असा मजकूर चिठ्ठीत आहे. व तसा इमेल पाठवल होता. वडवणी पोलीस स्टेशनला विश्वजीत विनायक चंदेल यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की माझे वडील रक्षाबंधनाला गावाकडे आले असता त्यांनी मला व माझी आई, आजोबा, दोन्ही चुलते यांना सांगीतले कि वडवणी कोर्टाचे जज रफीक शेख हे मला सतत कोर्टाचे कामकाज चालु असतांना सर्वांसमोर अपमानित करतात व तारडे नावाचा क्लार्क हा मी गुन्ह्याची फाईल घेत असताना मला अपमानास्पद शब्द वापरतो व कोर्टाचे जज़ माझा अपमान करीत असतांना तायडे त्यामध्ये सामील असतो. मला जज़ रफीक शेख व तायडे क्लार्क यांचा खुप त्रास होत आहे. मी त्याच्या त्रासाला वैतागलेलो आहे. यासह न्यायाधीश रफिक शेख व लिपीक तारडे हे सतत माझ्या वडिलांना त्रास देत असल्यामुळे त्यांनी त्यांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केलेली आहे असे दिलेले फिर्यादीवरून पोलीस स्टेशनला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल झालेला आहे या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक वर्षा व्हगाडे मॅडम ह्या करत आहेत.

# सभापती रमजान तांबोळी यांना मातृशोक

## एका संघर्षमयी आणि वात्सल्यमूर्ती आईचा अस्त

प्रतिनिधी @ आष्टी

कडा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी यांच्या मातोश्री, एका मोठ्या आणि प्रतिष्ठित कुटुंबाचा आधारस्तंभ असलेल्या नजमुन्नीसा या माऊलीचे गुरुवारी रात्री उपचारादरम्यान निधन झाले. वयाच्या ८७ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने तांबोळी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, संपूर्ण कडा शहरावर शोककळा पसरली आहे.

त्यांनी तब्बल १३ आपत्यांना (५ मुले आणि ८ मुली) जन्म दिला होता. दुर्दैवाने, त्यापैकी एका मुलाचे आणि एका मुलीचे यापूर्वीच निधन झाले आहे. त्यांची संपूर्ण हयात म्हणजे संघर्ष आणि त्यागाची एक गाथा होती. १९९६ साली त्यांचे पती नूरमोहंमद यांचे निधन झाल्यानंतर कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर आली होती. त्याही आधी, १९८३ साली कडा नदीला आलेल्या महापुरात नदीकाठी असलेले त्यांचे घर आणि संपूर्ण संसार वाहून गेला होता. अशा परिस्थितीतही खचून न जाता, त्यांनी मोठ्या धैर्याने परिस्थितीला तोंड दिले.

कडा शहरात अलंकार नावाची खानावळ सुरू करून त्यांनी अत्यंत हालाखीच्या परिस्थितीतून आपल्या मुलाबाळांचा संसार उभा केला. त्यांच्या याच कष्टामुळे आणि संस्कारांमुळे त्यांची मुले आज समाजात मोठ्या उंचीवर पोहोचली आहेत. त्यांचे एक सुपुत्र बब्लूशेठ तांबोळी यांनी कांदा व्यवसायात मोठे नाव कमावले, तर दुसरे सुपुत्र रमजान तांबोळी यांनी राजकारणात आपले स्थान निर्माण करत सभापतीपदापर्यंत मजल मारली. आपल्या मुलांची ही उत्तरोत्तर प्रगती पाहणे, हे त्या आईसाठी सर्वात मोठ्या गौरवाची आणि आनंदाची बाब होती.

गुरुवारी त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने कडा येथील गांधी हॉस्पिटलमध्ये चे डॉ. अशोक गांधी आणि डॉ. उमेश गांधी यांनी त्यांना वाचवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले, परंतु अखेर त्यांची प्राणज्योत मालवली. डॉ. पाचे आणि डॉ. महेंद्र पटवा हे नेहमीच त्यांच्या आरोग्याची काळजी घेत असत. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी रात्री १०:३० वाजता कडा येथील बस स्थानकासमोर दफनविधी करण्यात आला आहे. एका संघर्षशील, प्रेमळ आणि वात्सल्यमूर्ती आईच्या जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# वारकरी संप्रदायाचा प्रसार श्री संत सेना महाराजांनी केला - ह.भ.प.जनार्धन महाराज चलवाड

## श्री संत सेना महाराजांनी समतेचा विचार मांडला – आमदार सौ.नमिताताई मुंदडा

प्रतिनिधी @ अंबाजोगाई

श्री संत सेना महाराज यांच्या ६२६ व्या पुण्यतिथीनिमित्त अंबाजोगाई येथे बुधवार, दि. २० ऑगस्ट २०२५ रोजी प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी श्रींचा अभिषेक व महापुजा, महाआरती, किर्तन, भक्तीगीत गायन आयोजन करण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमास उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ भाविक भक्त, सर्व समाज बांधवांनी घेतला.

संत सेना महाराज प्रतिष्ठान व नाभिक एकता महासंघाच्या वतीने आयोजित केलेल्या पुण्यतिथी सोहळा शहरातील श्री संत सेना महाराज व श्री संत नरहरी महाराज मंदिर, मुकुंदराज रोड, अंबाजोगाई येथे बुधवार, दि.२० ऑगस्ट रोजी श्रींचा अभिषेक व महापुजा, महाआरती, किर्तन, भक्तीगीत गायन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुसार सकाळी ७ ते ९ वाजता या वेळेत श्रीहरी (मामा) गवळी व माणिकराव (मामा) राऊत, विष्णु कचरे, पांडुरंग कचरे, बालाजी गोरे यांच्या हस्ते श्रींचा अभिषेक व महापुजा करण्यात आली. सकाळी १० ते १२ वाजता या वेळेत ह.भ.प.जनार्धन महाराज चलवाड (श्री.जगदुरू तुकोबाराय पावनधाम, औरंगपुर) यांची किर्तन सेवा संपन्न झाली. यावेळी आपल्या सुश्राव्य किर्तनातून ह.भ.प.चलवाड यांनी संत सेना महाराज यांच्या संपूर्ण अध्यात्मिक जीवनावर आपल्या प्रवचनातून पांडुरंग व सेना महाराज यांच्या भक्ती बद्दल सांगितले संत सेना महाराज हे संत ज्ञानेश्वर महाराज, संत रोहिदास महाराज, संत नामदेव महाराज यांच्या समकालीन संत होते. जन्म राजस्थानात झाला. परंतु, महाराष्ट्रात आल्यानंतर वारकरी संप्रदायाचे ते एक भाग बनले. त्यांचे अनेक अभंग, व चरित्रात्मक माहिती याबाबत अनेक संतांच्या अभंगातून समाजासमोर आलेले दिसून येते. असे विचार व्यक्त केले. तर केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ.नमिताताई अक्षय मुंदडा यांनी सांगितले की, संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराजांप्रमाणेच संत सेना महाराजांना ही श्रेष्ठ मानले जाते. संत सेना महाराजांचे अभंग मोठ्या आवडीने आजतागायत गायले जातात. सेना महाराजांनी हजारो अभंगांची निर्मिती करून 'सैनपंथ' नांवाची चळवळ भारतात सुरू केली. हीच चळवळ आज महाराष्ट्रात वारकरी चळवळ म्हणून प्रसिद्ध आहे. संत सेना महाराजांनी समतेचा विचार मांडला असे गौरवोद्गार आमदार सौ.मुंदडा यांनी काढले. या कार्यक्रमास प्रमुख पाहूणे म्हणून माजी उपनगराध्यक्ष दिलीप सांगळे, बापूसाहेब टाक, हनुमंत दहिवाळ, बबन दहिवाळ, राजेश पंडित, ॲड.किशोर गिरवलकर, कालिदास मैड, हिंदुलाल काकडे, भाजपाचे शहराध्यक्ष संजय गंभीरे, ॲड.दिलीप चामनर, अनंत अरसुळे आदींची उपस्थिती होती. किर्तन व भजनाचे मानकरी प्रा.विजयकुमार बिदरकर, भिमराव बाबुराव कचरे हे होते. त्यानंतर दुपारी १२ ते दुपारी २ वाजता या वेळेत सुप्रसिद्ध गायक सुभाष शेप व संच यांचा भक्तीगितांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यानंतर उपस्थित सर्वांना महाप्रसाद वाटप करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नाभिक महामंडळाचे संघटक कविराज कचरे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार नाभिक एकता कर्मचारी महासंघाचे स्थानिक अध्यक्ष डॉ.केशवराव राऊत आणि नवनाथ राऊत यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री संत सेना महाराज प्रतिष्ठाण, राष्ट्रीय नाभिक एकता महासंघ, अंबाजोगाईचे अध्यक्ष मधुकर सुरवसे, जिवराज गवळी, भिमराव कचरे, परमेश्वर गवळी, अजिंक्य राऊत, संतोष गवळी, राजकुमार जाधव, संभाजी राऊत, अभिराज गवळी, नरसिंग वाटकर, ज्येष्ठ मार्गदर्शक माणिकराव हारणे, निवृत्तीराव कचरे,




# देगलूर : शिवलीलामृत पारायणाचा समारोप; रामदास पाटलांचा समाजप्रबोधनपर संदेश

देगलूर (प्रतिनिधी) :

गांधी चौक येथील बंडय्याप्पा स्वामी मंठ संस्थान येथे पाच दिवस चाललेल्या श्रावणमासी सामूहिक शिवलीलामृत पारायण सोहळ्याचा समारोप सोमवारी मोठ्या भक्तिभावात झाला. गुरुवर्य सद्गुरु सोमलिंग शिवाचार्य महाराज बिचकुंदेकर व गुरुवर्य दिगंबर महाराज वसमतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवपाठ, प्रवचन व प्रसादाचे आयोजन करण्यात आले.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले रामदास पाटील सुमठानकर यांनी समाजाला मार्गदर्शन करताना सांगितले की, मुलींचे कमी वयात लग्न करू नये, त्यांना शिकू द्यावे, अधिकारी बनवावे. मुलं-मुली उच्चशिक्षित बनली तर समाज प्रगत होईल. समाजासाठी कधीही हाक द्या, मी तत्पर आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.




समारोप सोहळ्याला अनिल पाटील खानापूरकर, आनंद पाटील, सचिन पाटील कारेगावकर, रुपेश पाटील भोकसखेडकर, संतोष पाटील गोजेगावकर, कैलास ऐसगे, मन्मथ स्वामी, माणिक कोकले, मालतीताई आचमारे, हावगी पन्नासे, ओंकार स्वामी, गुरुलिंग स्वामी यांच्यासह असंख्य भाविक भक्त उपस्थित होते.



सावळदबारा प्रतिनिधी : शुक्रवारी रोजीपोळासण उत्साहात साजरा करण्यात आलापोळा सण बैलाची पूजा करून गोड पदार्थ चा स्वाद देण्यात आला यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते,संगिता कोलते,अंकुश कोलते,लव कोलते व होते

# संकल्प मेळाव्यास हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा रिपाइं तालुकाध्यक्ष दिपक कांबळे यांचे आवाहन

प्रतिनिधी @ केज



बहुजन समाजातील उपेक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व त्यांना सामाजिक शैक्षणिक व सामाजिक स्तरावर खऱ्या अर्थाने हक्क मिळवून देण्या साठी गायरान धारकांचे प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्यासाठी व विविध प्रश्नांची शासन दरबारी सोडवणूक करण्यासाठी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री ना.रामदास आठवले यांच्या आदेशा वरून युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइं चे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या प्रमुख उपस्थितीत केज तालुका रिपाइंच्या वतीने दि.२५ ऑगस्ट २०२५ सोमवार रोजी दुपारी ठीक १२-३० वाजता मुक्ताई फंक्शन हॉल भवानी चौक केज येथे संकल्प मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यास राजू जोगदंड,मझरखान प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत.याचमेळाव्याच्या माध्यमातून येऊ घातलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसह स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत काय संदेश देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.भारत देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्ष पूर्ण झाले असताना सुद्धा उपेक्षित घटकातील समाज बांधवांना आपल्या हक्क व अधिकारासाठी संघर्ष करावा लागत आहे. उपेक्षित घटकातील समाज बांधवांना त्यांचे हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी केज तालुका रिपाइंच्या वतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या प्रमुख उपस्थितीत केज शहरातील मुक्ताई फंक्शन हॉल भवानी चौक केज येथे रिपाइंचा भव्य संकल्प मेळावा दि.२५ ऑगस्ट २०२५ सोमवार रोजी आयोजित करण्यात आला आहे.तरी या मेळाव्यास रिपाइं पदाधिकारी,युवा आघाडी पदाधिकारी, गायरानधारक,घरकुल धारक,कार्यकर्ते यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे.असे आवाहन संकल्प मेळाव्याचे आयोजक तथा केज रिपाइंचे तालुकाध्यक्ष दीपक कांबळे,गोवर्धनवाघमारे,उत्तम आप्पा मस्के, राहुल सरवदे,रवींद्र जोगदंड,दिलीप बनसोडे,ईश्वर सोनवणे, विकास मस्के,कपिल कागदे,रमेश निशिगंध, गौतम बचुटे,निलेश ढोबळे,राजेश सोनवणे, सुरज काळे,बाळासाहेब ओव्हाळ,प्रशांत हजारे, अनिता वाघमारे,सुरेखा गायकवाड,सरस्वती शिनगारे,विकास आरकडे,भारत गायकवाड,मिलिंद भालेराव,कैलास जावळे,हरीश गायकवाड,दादाराव धेंडे,अंबादास तुपारे, रुपचंद ढालमारे, इब्राहिम इनामदार, शेख मौला,जयपाल रोकडे,प्रदिप शिनगारे, नितीन घोडके,हरेंद्र धीरे,डॉ.चत्रभुज हिरवे, मसु बचुटे,विनोद गायकवाड,रवींद्र तुपारे, संभाजी हजारे,विनोद शिंदे,रोहित बचुटे,राहुल बचुटे आदींनी केले आहे.संकल्प काय ! या संकल्प मेळाव्याच्या माध्यमातून काही दिवसात येणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसह स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत पप्पू कागदे हे कार्यकर्त्यांना काय संदेश देणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे बॅनर्स,झेंडे आणि पताका लागल्याने मेळाव्याची चर्चा - केज शहरात आणि शहरात येणाऱ्या रस्त्यांवर शहराच्या बाहेर देखील दीड ते दोन किमी अंतरावर मेळाव्याचे बॅनर्स,झेंडे आणि निळ्या पताका लावल्याने सर्वत्र मेळाव्याची चर्चा आहे.

# बच्चू कडू यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत शेतकऱ्यांनी साजरा केला सातबारा कोरा पोळा..




परभणी - बच्चुभाऊ कडू यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत परभणी जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी सातबारा कोरा पोळा साजरा केला. परभणी, जिंतूर व सोनपेठ येथील परभणी तालुक्यातील मटकऱ्हाळा येथे उध्दव गरुड व जिंतूर तालुक्यातील मालेगाव दुधना येथील रामेश्वर पुरी या शेतकऱ्यांनी आपल्या बैलांच्या पाठीवर सातबारा कोरा हा मेसेज लिहून गावामध्ये मिरवणूक काढत पोळा साजरा केला.

सातबारा कोरा हा मेसेज बैलांच्या पाठीवर व झूलीवर लिहून बैलांची संपूर्ण गावात मिरवणूक काढून सरकारला सातबारा कोरा करण्याबाबत विनंती केली.

# वडवणीत तालुकास्तरीय अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा उत्साहात

## चि.आदित्य मुळे प्रथम तर कु.समृध्दी जाधव व्दितीय

प्रतिनिधी @ वडवणी

वडवणी शहरातील डॉ.सोनाजीराव रांजवण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय याठिकाणी काल दि.२१ ऑगस्ट २०२५ गुरुवार रोजी तालुकास्तरीय अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा उत्साहात संपन्न झाला. यामध्ये अनेक शाळांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत वैज्ञानिक विषयाचे सादरीकरण केले. या तालुकास्तरीय स्पर्धेत शेवटी निकालात चि.आदित्य मुळे याने प्रथम तर कु.समृध्दी जाधव हिने व्दितीय क्रमांक पटकावला.

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक कार्यकारणभाव समजून, विश्लेषणात्मक विचारांची जागृती करणे, स्पर्धात्मक वैज्ञानिक दृष्टिकोन वृध्दिंगत करुन भावी वैज्ञानिकांना विचारांच्या आदान-प्रदानाची संधी उपलब्ध करुन देणे, देशात विखुरलेल्या प्रज्ञावाण युवकांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृध्दिंगत करणे ही उद्दिष्टे समोर ठेवून राष्ट्रीय विज्ञान संग्रहालय परिषद कोलकत्ता, प्रादेशिक विद्या प्राधिकरण नागपूर व गटसाधन केंद्र वडवणी यांच्या वतीने वडवणी शहरातील डॉ.सोनाजीराव रांजवण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय याठिकाणी काल दि.२१ ऑगस्ट २०२५ गुरुवार रोजी या तालुकास्तरीय अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या विज्ञान मेळाव्याचे उदघाटन वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांच्या हस्ते करण्यात आले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक यशवंत भोसले सर हे होते. प्रमुख उपस्थितीत वडवणी केंद्राचे केंद्रप्रमुख सुरेश करांडे सर व पर्यवेक्षक लांडे सर हे उपस्थित होते. या तालुकास्तरीय अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळाव्याचे उदघाटन मान्यवरांच्या हस्ते फित कापून व देशाचे दिवंगत राष्ट्रपती तथा महान वैज्ञानिक डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमाचे पूजन करुन करण्यात आले. यावर्षी विज्ञान मेळाव्याचा विषय क्वांटम युगाची सुरुवात संभाव्यता व आवाहने असा होता. या विज्ञान मेळाव्यामध्ये वडवणी तालुक्यातून माध्यमिक विभागातून एकूण १० शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. सर्व सहभागी स्पर्धकांची सर्वप्रथम विज्ञान विषयाचे आशय ज्ञानासाठी १० गुणांची लेखी चाचणी घेण्यात आली. सहभागी विद्यार्थ्यांनी सेमिनार पध्दतीने विषयाचे सादरीकरण दृक शैक्षणिक साहित्याचा वापर केला. व त्यानंतर तोंडी प्रश्न त्यांना विचारण्यात आले. या मेळाव्यात डॉ.सोनाजीराव रांजवण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वडवणीचा इयत्ता आठवीचा विद्यार्थी चि.आदित्य अमोल मुळे याने अतिशय अभ्यासपूर्ण माहितीचे सादरीकरण केले व तालुकास्तरावर सर्वप्रथम क्रमांक पटकावला



व माध्यमिक विद्यालय पिंपरखेडची विद्यार्थिनी कु.समृध्दी शहादेव जाधव हिने व्दितीय क्रमांक पटकावला व आगामी बीड जिल्हास्तरीय विज्ञान मेळाव्यासाठी त्याची निवड करण्यात आली. या विज्ञान मेळाव्याचे परिक्षक म्हणून प्रा.पाटील सर व प्रा.शेळके मॅडम यांनी काम पाहिले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दोघांचेही पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देवून सन्मान व सत्कार करण्यात आला. या यशाबध्दल वडवणी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे, वडवणीचे केंद्रप्रमुख सुरेश करांडे, मुख्याध्यापक यशवंत भोसले, पर्यवेक्षक लांडे सर यांनी अभिनंदन व कौतुक केले. तसेच सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देवून त्यांचे देखील अभिनंदन करण्यात आले. या तालुकास्तरीय विज्ञान मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी गटसाधन केंद्रातील साधनव्यक्ती श्रीमती.मैमुना मॅडम तालुका समन्वयक, शेख माजेद सर, शेख मुजफ्फर सर यांनी काम पाहिले.

# एसटी तपासणी अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे प्रवाशांना त्रास

प्रतिनिधी @ वडवणी

एसटी महामंडळाच्या तपासणी अधिकारी यांच्या मनमानी कारभारामुळे प्रवाशांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. तिकीट तपासणीच्या नावाखाली वाहनचालक व वाहकांवर दबाव आणणे तसेच प्रवाशांना उभे ठाकवून चौकशी करणे यामुळे संतापाची लाट उसळली आहे.ग्रामीण व शहरी भागातील प्रवासी दररोज एसटीने प्रवास करतात. मात्र तपासणी अधिकाऱ्यांच्या वागणुकीमुळे प्रवाशांच्या संयमाचा अंत होत आहे.तरी एसटी महामंडळाच्या मनमानी कारभार करणाऱ्या तपासणी अधिकारी यांच्यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कारवाई करावी अशी मागणी प्रवाशातुन होत आहे. सविस्तर वृत्त असे की,दि.१८ऑगस्ट २०२५रोजी केज ते धारूर बस नं. २९३० या बस मध्ये प्रवासी प्रवास करत असताना बसचे चालक प्रताप मुंडे व वाहक सहदेव मंत्रे हे आपले कर्तव्य करत असताना केज पासून दोन ते तीन किलोमीटर अंतरावर संध्याकाळी सहा ते साडे सहा वाजण्याच्या दरम्यान तपासणी अधिकारी लबाडे साहेब व त्यांच्या सहकाऱ्यांनी अर्धा तास बस वाटतच थांबून तपासली असता सदर बस मध्ये वाहकाने तपासणी अगोदर संपूर्ण प्रवाशाला तिकीट दिलेले होते बस थांबली असता तिकीट तपासणी करत असताना वाहकाला लबाडे साहेबांनी आरेरावेची भाषा सुरु केली व नंतर त्यांनी वाहकाची आणि चालकाची व्हिडिओ शूटिंग केली आम्ही प्रवासी तपासणी अधिकारी साहेबाला विनंती करत होतो की चालू बसमध्ये तिकीट तपासणी करा कारण आमची पुढच्या गावाला जायचे आहे उशीर झाल्यावर आम्हाला पुढे जाण्यासाठी बस मिळत नाही परंतु लबाडे साहेबांनी प्रवाशाचं कुठलेही ऐकून घेतले नाही अर्धा तास बस थांबवल्यामुळे दहा ते बारा प्रवासी धारूर पासून पुढे आंबेवडगाव व इतर गावी जायचे होते परंतु उशीर झाल्यामुळे धारूरला येण्या अगोदरच पुढील बस निघून गेल्या होत्या नंतर त्यांना खाजगी गाडीने उशिरा गावी पोहोचावा लागले व त्याचा नाहक मानसिक त्रास या प्रवाशांना सहन करावा लागला तरी या मनमानी तपासणी अधिकारी लबडे यांची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी प्रवाशातून होत आहे .



# परभणी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी अंतिम प्रभाग रचना जाहीर

परभणी : राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाचे सहसचिव यांच्या १२ जून २०२५ रोजीच्या आदेशानुसार परभणी जिल्ह्यातील जिल्हा परिषद व त्याअंतर्गत ९ पंचायत समित्यांची सार्वत्रिक निवडणूक- २०२५-२६ करीता प्रभाग रचनेचा कार्यक्रम घोषित करण्यात आलेला आहे. त्यानुसार अंतिम प्रभाग रचना आज दि. २२ ऑगस्ट २०२५ रोजी परिशिष्ट ८ (अ) व ८(ब) मध्ये खालील ठिकाणी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, परभणी कार्यालय, संबंधित उपविभागीय अधिकारी कार्यालय, संबंधित तहसील कार्यालय आणि संबंधित पंचायत समितींच्या नोटीस बोर्डावर आणि जिल्हाधिकारी कार्यालयाचे संकेतस्थळ हींींि:// रिीलहरपळ.सें.ळप वर उपलब्ध असेल, सर्व संबंधितांनी अंतिम प्रभाग रचनेचे अवलोकन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी संजय चव्हाण यांनी केले आहे.

# जिल्हाधिकारी यांच्या सूचनेने रस्ता रोकोला स्थगिती....



मंठा /प्रतिनिधी :- मंठा जालना राष्ट्रीय महामार्ग ७५२ वरील रस्त्यालगत असलेल्या नाल्या बुजवण्यात आल्याने नाल्याचे पाणी रस्त्यावर साचत असल्याने स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व परिसरातील व्यवसायिकांसह नागरिकांना रहदारी करताना तारेवरची कसरत करावी लागत असल्याने रस्त्यावरील पाण्याचे नियोजन तात्काळ करावे अन्यथा(ता २०) बुधवार रोजी रस्ता रोको करण्याचा इशारा परिसरातील नागरिकांनी मा. तहसीलदार यांना निवेदनाद्वारे दिला होता.

सदरील निवेदना बाबत माहिती देण्यासाठी बाजार समितीचे उपसभापती गोपालराव बोराडे व इतर यांनी मा.जिल्हाधिकारी अशीमा मित्तल यांची भेट घेऊन रस्त्यावरील तुंबलेल्या पाण्याबाबतची कैफियत मांडली यावर मा. जिल्हाधिकारी अशीमा मित्तल यांनी तुंबलेल्या नाल्याचे काम तत्काळ करून देण्याचे आश्वासन देऊन संबंधित रस्ता रोको आंदोलन स्थगित करण्यात यावे.असे सुचवल्याने (ता.२०) रोजी करण्यात येणारे रस्ता रोको आंदोलन स्थगित करण्यात आले असल्याची माहिती गोपाळराव बोराडे यांनी दिली या वेळी राजंन बोराडे,शुभम बोराडे, संतीष देशमुख,अशिष मोरे,गणेश गायकवाड,कृष्णा हेलसकर,नाना देवणे, आर्थव मोरे,सुभाष बोराडे,यांची उपस्थिती होती.

# आवरगाव मध्ये जिओचे नेटवर्क गायप ;संतप्त नागरिकांनी जिओ ला ठोकला रामराम.उर्वरित जियो ग्राहक आंदोलन छेडण्याच्या तयारीत

किल्ले धारूर/अविनाश जगताप

किल्ले धारूर तालुक्यातील आवरगाव व परिसरात मागील अनेक दिवसांपासून जिओ मोबाईल चे नेटवर्क पूर्णपणे ठप्प झाल्याने आवरगाव येथील नागरिक,व्यापारी,शेतकरी आणि विद्यार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. गावातील प्रमुख ठिकाणीही जिओचे सिग्नल रेंज मिळत नसल्याने अनेक वेळा मोबाईल फोनवर 'नो नेटवर्क' अशीच स्थिती दिसून येत आहे.

नेटवर्क खंडित झाल्यामुळे मोबाईल कॉल्स वारंवार तुटत आहेत,तर इंटरनेट वेग इतका कमी झाला आहे की,साधा व्हॉट्सॲप मेसेज पाठवायलाही काही मिनिटे वाट पहावी लागत आहेत.यामुळे विद्यार्थ्यांचे ऑनलाइन क्लास,शेतकऱ्यांचे कृषीविषयक व्यवहार,व्यापाऱ्यांचे डिजिटल पेमेंट, तसेच नागरिकांचे सरकारी कार्यालयांशी संबंधित ऑनलाईन कामकाज पूर्णपणे ठप्प झाले आहे.

गावातील शेतकरी नागरिक सांगतात की,पिकविमा,खत सबसिडी,शेतमाल विक्रीची नोंदणी,पिक पाहणी तसेच हवामान अंदाज तपासण्यासाठी इंटरनेटवर अवलंबून राहावे लागते.परंतु जियो चे नेटवर्क



नसल्यामुळे वेळेत माहिती मिळत नाही आणि त्यामुळे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता वाढते.

ग्रामस्थांच्या मते, ही समस्या मागील अनेक दिवसांपासून सुरू असून, अनेकांनी ग्राहक सेवा केंद्राशी तसेच जिओच्या स्थानिक अधिकाऱ्यांशी संपर्क साधला आहे. मात्र अद्याप कोणतेही ठोस पाऊल उचलले गेले नाही.त्यामुळे लोकांमध्ये तीव्र नाराजी आहे. काही नागरिकांनी जिओच्या अधिकृत सोशल मीडिया पेजवर तक्रारी नोंदवल्या असून, लवकरात लवकर नेटवर्क सुरळीत न झाल्यास गावकरी नागरिकांनी जिओला रामराम ठोकण्याचा निर्धार केला व काही नागरिक जियो ला सोडून इतर कंपनी चे नेटवर्क घेतले आहे व जिओच्या धारूर येथील कार्यालया समोर तीव्र स्वरूपाचे रीतसर आंदोलन करण्याचाही इशारा सदरील प्रसिद्धी पत्रकातून नागरिकांतून दिला आहे.

नेटवर्क मिळवण्यासाठी घ्यावा लागतो उंच ठिकाणाचा आधार-

गावात मोबाईल सिग्नल मिळवण्यासाठी शेतामध्ये, टेकड्यांवर आणि घरांच्या छतावर चढून कॉल करण्याचा प्रयत्न करावा लागत आहे, यासंदर्भात जिओ कंपनीनी ग्रामस्थांची होणारी गैरसोय तातडीने दूर करून उपाययोजना कराव्यात,अन्यथा कंपनीविरोधात आवाज उठवू असे गावातील ज्येष्ठ नागरिकांनी सांगितले.



# अंबाजोगाई येथील कपील गणेश मंदिर येथे रविवारी प्रशांत गाजरे यांचे तबला वादन

प्रतिनिधी @ अंबाजोगाई


अंबाजोगाई येथील कपील गणेश मंदिर येथे संगीत साधना मंच,आदर्श गणेश प्रतिष्ठानच्या वतीने रविवार दि.२४ ऑगस्ट रोजी सकाळी साडे दहा वाजता आदर्श वसाहती मधील कपिल गणेश मंदीर येथे शास्त्रीय संगीत साधक व रसिकांसाठी नांदेड येथील प्रख्यात तबला वादक प्रशांत गाजरे यांचे स्वतंत्र तबला वादन होणार आहे. संवादिनीवर परभणी येथील मंगेश जवळेकर हे साथ संगत करतील या मासिक संगीत सभेचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# सोनिमोह्यात यावर्षी पोळ्याच्या सणाला चोंडीच्या बैलाला मान

प्रतिनिधी @ धारूर

पोळ्याला गावात पोलिस पाटील, सरपंच किंवा परंपरेनुसार कुटुंबाच्या मालकीच्या बैलाला मिरवणुकीचा मान दिला जातो. परंतु, सोनीमोहा गावात पोळ्याचा सणाचा मान गावातील व्यक्तीला न देता दुसऱ्या गावच्या पाहुण्याच्या मालकीच्या बैलाला देण्याची आगळीवेगळी परंपरा गेल्या दीडशे वर्षांपेक्षा अधिक वर्षांपासून सुरू आहे. शुक्रवारी पोळ्याचा मान चोंडी येथील हानुमंत विष्णू मुंडे यांच्या बैलाला मिळाला.

पोळ्याच्या सणाला बैलाच्या मिरवणुकीत मानपानाची परंपरा आहे. पोळ्याला आधी कोणाचा बैल मिरवायचा ते काही गावांमध्ये ठरलेले असते. सरपंच, पोलिस पाटील किंवा प्रमुख वाड्यातील कुटुंबाच्या मालकीच्या बैलाला हा मान मिळतो असतो. मानपानावरून कुटुंबात वाद होऊ नयेत तसेच गावामध्ये वाद तंटे होऊ नयेत म्हणून सोनीमोहा येथील ग्रामस्थांनी मागील अनेक वर्षांपासून आगळीवेगळी परंपरा जोपासलेली आहे .बैल मिरवणुकीच्या



कारणावरून भांडण होऊ नये म्हणून पोळ्याच्या सणाला बैल मिरवणुकीसाठी दुसऱ्या गावातील किंवा पाहुण्याचा बैल मिळवण्याची परंपरा जवळपास दीडशे वर्षांपेक्षा अधिक कालावधीपासून सुरू आहे. यंदा चोंडी गावातील हानुमंत मुंडे यांचा बैल सोनीमोह्यात आणून सुरुवातीला त्याची मिरवणूक काढली. यानंतरच गावातील इतर बैलांची मिरवणूक काढली.मिरवणुकीचे काम एका ठराविक व्यक्तीला देण्यात आलेले आहे .गावातील दिलीप आडगळे यांनी चोंडी येथे जाऊन बैल आणून त्याची दुपारी तीन वाजता मिरवणूक काढली . यानंतर इतर बैलांची मिरवणूक पार पडली . पोलिस बंदोबस्ताशिवाय शांततेत बैलपोळ्याची मिरवणूक पार पडली. गावाची ही परंपरा सुरू असल्यामुळे या गावाला तंटामुक्त अभियानात शांततेचा पुरस्कार मिळाला होता

# विश्वनाथ मंदिरातील शिवमहापुराण कथा सोहळ्याची सांगता

## शिवभक्तांनी माऊली समूहाचे आभार मानले

प्रतिनिधी @ वडवणी

वडवणी शहरातील तहसील कार्यालयाच्या पाठीमागे युवा उद्योजक विनोदशेठ आसलकर यांनी स्वतःच्या जागेत उभारलेल्या श्री.विश्वनाथ मंदिर याठिकाणी श्रावण मासाचे औचित्य साधून भव्य अशा शिवमहापुराण कथाचे आयोजन दि.१५ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजीपासून करण्यात आले होते. तर या कार्यक्रमाची सांगता दि.२१ ऑगस्ट २०२५ गुरुवार रोजी संपन्न झाली. या शिवमहापुराण कथेच्या श्रवणासाठी सात दिवस विश्वनाथ मंदिराचा परिसर गर्दीने तुडुंब भरला होता. याप्रसंगी वडवणीसह पंचक्रोशीतील शिवभक्त व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांची उपस्थिती तर लक्षणीय होती. शेवटी सर्वांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला.

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी शहरातील तहसील कार्यालयाच्या पाठीमागे येथील वस्त्रोद्योग क्षेत्रातील नामांकित युवा उद्योजक विनोदशेठ आसलकर यांनी स्वतःच्या जागेत उभारलेल्या श्री.विश्वनाथ शंभू महादेवाचा परिसर हा नेहमीच शिवभक्तांच्या गर्दीने भरलेला असतो. याच ठिकाणी महाराष्ट्रातील नामांकित किर्तनकार ह.भ.प.राजाभाऊ महाराज म्हेत्रे जामखेड यांच्या मार्गदर्शनाखाली श्रावण मासाचे औचित्य साधून भव्य अशा शिवमहापुराण कथाचे आयोजन दि.१५ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजीपासून दैनंदिन दुपारी २ ते ५ या वेळेत करण्यात आलेले होते. त्याचप्रमाणे सायंकाळी ५ ते ७ या वेळेमध्ये हरिपाठ व महिलांचा फुगड्यांचा यांचा कार्यक्रम देखील उत्साहात संपन्न झाला यामध्ये दररोज असंख्य महिलांनी अत्यंत उल्हासाने सहभाग घेतला होता. ज्या महिला भक्ताने अतिशय सुंदर अशा प्रकारे फुगडी खेळली त्यांना माऊली समूहाच्या वतीने दररोज एक छान व सुंदर अशी पैठणीही भेट म्हणून देण्यात आली. महाराष्ट्रातील नामांकित शिवमहापुराण कथा प्रवक्ते ह.भ.प.दत्तात्रय महाराज हूके साकतकर यांच्या कर्णमधुर वाणीतून या शिवमहापुराण कथेची भव्यता अगदी सुक्ष्मपणे भाविकांच्या मनावर बिंबली आहे. याप्रसंगी हरिपाठ नेतृत्व संगीत विशारद ह.भ.प.हरिभाऊ महाराज काळे, साथ संगत गायन गंधर्व ह.भ.प.सतीश महाराज खपके, मृदंगाचार्य ह.भ.प.बाबा



महाराज मुरुमकर यांची त्यांना साथ लाभली. दरम्यान शिवमहापुराण भगवान शंकर आणि त्यांच्या अवताराशी निगडीत आहे. त्यात शिव भक्ती, शिव महिमा आणि शिवाचे संपूर्ण जीवन चरित्र वर्णिले आहे. त्याच बरोबर ज्ञान, मोक्ष, उपास, तप, जप यांचा मिळणाऱ्या फळांचे देखील वर्णन आढळतं. शिव महापुराणामध्ये सहस्त्र ज्ञानवर्धक आणि भक्ती विषयक लिहिलेले असून यांविषयी सविस्तर असे वर्णन केलेले आहे. तरी वडवणीकरांसाठी हा शिवमहापुराण कथा सोहळा म्हणजे मोठी अध्यात्मिक पर्वणीच ठरली आहे. या कथेची सांगता दि.२१ ऑगस्ट २०२५ गुरुवार रोजी झाली. यादिवशी सकाळी ९ ते १० या वेळेमध्ये शिवमहापुराण कथा संपन्न झाली, त्यानंतर सकाळी १० ते १२ या वेळेमध्ये ह.भ.प.दत्तात्रय महाराज हूके साकतकर यांचे काल्याचे किर्तन झाले व त्यानंतर लागलीच महाप्रसादाची पंगत सुरु करण्यात आली. दरम्यान आपल्या लेखणीच्या माध्यमातून या अध्यात्मिक कार्याला अधिकतेने उजाळा देणारे वडवणी तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांचाही संयोजकांनी आभार सत्कार करुन त्यांचे आभार मानले.

# अतिवृष्टी मुळे नुकसान झालेल्या शेतीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावा – भाऊसाहेब भवर

प्रतिनिधी @ पाटोदा

पाटोदा तालुक्यात गेल्या आठवडाभरापासून सतत कोसळणाऱ्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक व नैसर्गिक हानी झाली आहे. शेतामध्ये पाणीच पाणी साचल्याने उभे पिके सडून हातची गेल्यात जमा झाली आहेत. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी अमळनेर जिल्हा परिषद गटाचे नेते भाऊसाहेब आण्णा भवर यांनी केली आहे. बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यात कुसळब, पिंपळवंडी, सुप्पा,वाहली चिखली, चिंचोली, सावरगाव घाट, सौताडा, घुलेवाडी, भुरेवाडी,मुगगाव, चिखली, चिंचोली,अंतापूर,निवडुंगा आदी गावांमध्ये पावसाने कहर केला आहे. शेतकऱ्यांच्या शेतांचे अक्षरशः तलाव झाले असून, पिके सडून जात आहेत. यामुळे शेतकऱ्यांच्या हिताचे नेते भाऊसाहेब भवर यांनी सांगितले की, अमळनेर सर्कल परिसरातील शेतकरी फक्त शेतीवरच अवलंबून



आहेत. त्यामुळे उभ्या पिकांचे झालेले प्रचंड नुकसान हा शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा मोठा प्रश्न निर्माण करणारा आहे. एकमेव उत्पन्नाचा मार्ग बंद झाल्याने शेतकरी मानसिक तणावाखाली येण्याची शक्यता आहे.यामुळे शेतकऱ्यांना आत्महत्येच्या मार्गावर जाण्यापासून वाचवण्यासाठी तातडीने पंचनामे करून भरीव आर्थिक मदत करणे अत्यावश्यक असल्याचे आवाहन भाऊसाहेब भवर यांनी प्रशासनाला केले आहे.